आवृत्ती – अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १३४ । बुधवार २५ फेब्रुवारी २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## मंत्री झिरवळ यांच्या कार्यालयातील लाचखोरी : विधानभवनाच्या पायऱ्यावर विरोधकांचा राडा



मुंबई – राज्याच्या विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजचा दुसरा दिवस सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी विरोधी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यावर प्रचंड घोषणा देत राडा केला. मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या खात्यातील लाचखोरी प्रकरणामुळे सध्या वातावरण तापले आहे. आता मंत्रालयातील लाचखोरी प्रकरणा विरोधात विरोधकांनी जोरदार आंदोलन केले. लाचखोर प्रकरणाचा विरोधकांनी कडाडून विरोध केला. यावेळी नरहरी झिरवळ यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

### महत्त्वाचे..

#### एनसीएमसी कार्डला प्रतिसाद : १० हजार प्रवाशांची नोंदणी

मुंबई : राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाच्या बस तिकिट आणि सवलतीसाठी आता 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) अनिवार्य केले आहे. एसटी बसमध्ये विद्यार्थी, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, महिला, पुरस्कारार्थी आदी सुमारे ३५ प्रकारच्या प्रवाशांना विविध प्रकारच्या सवलती दिल्या जातात. या कार्डासाठी नोंदणी सुरू झाली आहे. आतापर्यंत सुमारे १० हजार प्रवाशांनी यासाठी नोंदणी केली आहे.

राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाने प्रवासातील सवलतींकरिता आता 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (एनसीएमसी) अनिवार्य केले आहे. या कार्डची नोंदणी विभागीय कार्यालय आणि डेपोमध्ये सुरू करण्यात आली असून, आतापर्यंत सुमारे १० हजार प्रवाशांनी त्याचा लाभ घेतला आहे.

# मुख्यमंत्र्यांकडून १२ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या

## अर्थसंकल्पीय अधिवेशन : महसुली खात्यांसाठी ५७४८ कोटी, भांडवली खात्यांसाठी ६००३ कोटी रुपयांची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई :महाराष्ट्राच्या विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन २३ फेब्रुवारी म्हणजेच कालपासून सुरु झालं आहे. आज राज्य सरकारच्यावतीनं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत ११,९९५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत पुरवणी मागण्या सादर केल्या. महसुली खात्यावरील एकूण खर्च – ५ हजार ७४८ कोटी रुपये तर भांडवली खात्यावरील खर्च ६ हजार ३ कोटी रुपये आहे. या पुरवणी मागण्यांमधील प्रमुख तरतुदी म्हणजे कोणत्या खात्यांसाठी आहेत याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे. ऊर्जा, कामगार, उद्योग आणि खनिकर्म विभागासाठी ४,०६६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापैकी सर्वाधिक ३२६२ कोटी रुपये वीज क्षेत्रासाठी, तर ८०३ कोटी रुपये ग्राम आणि लघु उद्योगांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागासाठी १४३१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तर ग्राम विकास विभागासाठी ७१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

नियोजन विभाग: ८० कोटी रुपये, अन्न व नागरी पुरवठा विभाग: ५५.५२ कोटी रुपये, ओबीसी कल्याण **(पान ४ वर)**



### 'पुरवणी अधिवेशन असे नाव द्या'

**राज्य सरकारकडून प्रत्येक अधिवेशनात पुरवणी मागण्या मांडल्या जात असल्यानं विरोधकांनी यावर आक्षेप घेतला आहे. अर्थसंकल्पीय, पावसाळी, हिवाळी अशी विधिमंडळाच्या अधिवेशनांन नावे देण्याऐवजी पुरवणी अधिवेशन असे एकच नाव द्यावे. उगीचच अर्थसंकल्पीय अधिवेशन वगैरे शब्द वापरून जनतेची दिशाभूल का करावी?**

**- काँग्रेस नेते सचिन सावंत**

# पार्थ पवार राज्यसभेवर!

## रामदास आठवले, धैर्यशील पाटील यांना संधी?







प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : राज्यसभा निवडणुकीसाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. मंगळवारी रात्री निवडणुकीच्या अनुषंगाने भाजपा कोर कमिटीची मुख्यमंत्री वर्षा निवास्थानी महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत भाजपच्या उमेदवारांवर चर्चा झाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पार्थ पवार यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे. याबाबत पुढील काही वेळेत घोषणा करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

भाजपकडून पुन्हा एकदा धैर्यशील पाटील यांना संधी देण्यात येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात जोराने सुरु आहे. केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना देखील महायुतीकडून पुन्हा एकदा संधी मिळणार असल्याचे सांगण्यात येत आहे. आठवले यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे. तर उरलेल्या जागांसाठी भाजपकडुन विजया रहाटकर, भागवत कराड, विनोद तावडे आणि माजी खासदार सुजय विखे यांच्या नावांची चर्चा आहे. शिंदे यांच्या शिवसेनेकडून राहुल शेवाळे यांच्या नावाची चर्चा आहे. संख्याबळानुसार ७ पैकी ६ जागांवर महायुती बाजी मारणार आहे. यामध्ये भाजपला चार, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेला एक– एक जागा मिळणार आहे. तर महाविकास **(पान ४ वर)**

### निवडणूक कार्यक्रम

**राज्यसभा निवडणूक २०२६ च्या कार्यक्रमा नूसार २६ फेब्रुवारी रोजी सुचना जारी करण्यात येणार आहे. अर्ज भरण्याची अंतिम तारीख ५ मार्च आणि अर्जांची छाननी: ६ मार्च तर अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ६मार्च २०२६ आहे १६ मार्च रोजी २०२६ सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.०० पर्यंत मतमोजणी सायंकाळी ५ वाजता होईल. तर २० मार्च रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल.**

# आ. ओगले यांनी ड्रग्स प्रकरण विधानसभेत गाजवले!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** श्रीरामपूरसह अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर ड्रग्स विकले जात असून यावर प्रशासनाकडून कोणतीच कारवाई केली जात नाही. याबाबत आमदार हेमंत ओगले यांनी प्रश्नोत्तराच्या तासामध्ये प्रश्न उचलून धरत याप्रश्नी कारवाई कधी करणार याचे उत्तर मुख्यमंत्री यांनी द्यावे, अशी मागणी आ. ओगले यांनी केली.

याबाबत मुख्यमंत्री यांनीही आमदार ओगले यांच्या या प्रश्नांचा खुलासा करत सरकारची भूमिका मांडली. विधानसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून या दिवसात प्रश्नोत्तराच्या काळात आमदार ओगले यांनी सांगितले की, श्रीरामपूर एम आयडीसीमध्ये मागील वर्षी १४ कोटींचे ड्रग्ज पोलिसांनी पकडले होते. सदरचे ड्रग्स पोलिसांनी हस्तगत करून अहिल्या नगरच्या पोलीस मुख्यालयात जमा केले होते मात्र येथील एका **(पान ४ वर)**



### इंस्टाग्रामद्वारे मार्केटिंग, कुरियरने वितरण...

कुरियरद्वारे अशा प्रकारचे नशेचे इंजेक्शन व गोळ्या येत असतील तर यापुढे कुरिअरवाल्यांनी तपासणी न करता कोणत्याही प्रकारचे पार्सल पाठवत असतील तर त्यांच्यावरही कारवाई केली जाईल. यासाठी सरकारने पथके नेमले आहेत. इंस्टाग्राम सारख्या सोशल मीडियाचा मार्केटिंग करण्यासाठी वापर केला जातो. याच माध्यमातून १६००–१६०० कोटींचे ड्रग्स पकडले आहे. या ड्रग्स प्रकरणातील आरोपी उत्तर प्रदेशमधूनच नव्हे तर विदेशात जाऊन आणले. याबाबत सरकारची १०० टक्के भूमिका सकारात्मक असून ड्रग्सविरोधात सरकार कठोर कारवाई करणार. **– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

# डॉ. सुजय विखे यांची भाजप प्रदेश उपाध्यक्षपदी निवड



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : महाराष्ट्रातील राजकारणात महत्त्वाची घडामोड घडत भाजपने आपल्या नव्या प्रदेश कार्यकारिणीची घोषणा केली आहे.

दीर्घ प्रतीक्षेनंतर जाहीर झालेल्या या यादीत अनेक नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली असून, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन मजबूत करण्याचा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, नगर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी निवड करत माजी खासदार डॉ. सुजय विखे यांना थेट प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मुंबईतून नव्या कार्यकारिणीची घोषणा केली. या घोषणेत डॉ. सुजय विखे यांच्यासह इतर दहा जणांची प्रदेश उपाध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली. विधानसभा, नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांदरम्यान त्यांनी केलेल्या संघटनात्मक कामाची आणि पक्षविस्तारासाठी घेतलेल्या मेहनतीची दखल या निवडीमधून घेतल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. नगर जिल्ह्यातून थेट राज्य संघटनेत एवढ्या उच्च पदावर वर्णी लागण्याची ही पहिलीच वेळ असल्याने कार्यकर्त्यांमध्ये **(पान ४ वर)**

### राजकीय समीकरणांमध्ये नवा अध्याय

**या नव्या नियुक्त्यांमुळे भाजपच्या राज्य संघटनेत ताजेपणा आणि नवे नेतृत्व समोर आले आहे. जिल्हा ते राज्य असा प्रवास करत नेतृत्वाला मिळालेली संधी ही कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी मानली जात आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक शिस्त, विस्तार आणि प्रभावी जनसंपर्क यावर भर देत पक्ष पुढील वाटचाल करणार असल्याचे संकेत या घोषणेतून मिळत आहेत.**

# मारुती इको व ट्रकच्या भीषण अपघातात चार ठार, एक जखमी

## पहाटेचा काळोख, रस्त्यावर विरळ वर्दळ आणि अचानक झालेली भीषण धडक!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : नगर–दौंड रोडवरील घारगाव शिवारात पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास मारुती इको आणि ट्रक यांच्यात झालेल्या अपघातात चार जण जागीच ठार, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

मळसुर (ता. पातूर, जि. अकोला) येथून मोलमजुरी करून उपजीविका भागविण्यासाठी गजानन जनार्धन पायघन (वय ४६) हे आपल्या कुटूंबासाह श्रीगोंदा तालुक्यातील चिंभळे येथील संतोष जाधव यांच्याकडे ४ वर्षांपासून कामाला होते. मात्र गावाकडे ग्रामदैवताची यात्रा असल्याने ते मारुती इको गाडीतून गावी जाऊन यात्रा उरकून श्रीगोंद्याकडे येत असताना पहाटे ३ च्या सुमारास मारुती इको (एम एच१६ डिजी ८२०८) व ट्रक (क्र एम एच १२डिटी ५६३) यांच्यात समोरासमोर भीषण अपघात झाला यामध्ये ४ जण जागीच ठार झाले. तर एक जण गंभीर जखमी आहे. त्यामध्ये मृत नितीन अनिल कोकाटे (वय २२ संतवाडी, काष्टी ता. श्रीगोंदा), गजानन जनार्धन पायघन (वय ४६),द्रौपदा गजानन पायघन (वय ३७),वैभव गजानन पायघन (वय १८) रा मळसुर (ता. पातूर, जि. अकोला) हे जागीच मयत झाले. या अपघातात करण गजानन पायघन हे जखमी झाले.

उपचारासाठी त्यांना अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघात इतका भीषण होता की इको गाडीच्या पुढील भागाचा अक्षरशः चुराडा झाला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत जखमींना बाहेर काढले.या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक मोहन गाजरे तपास करत आहेत. संबंधित ट्रक चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



**श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी संतवाडी येथील नितीन कोकाटे यांचा विवाह २१ एप्रिल रोजी होणार होता. पायघन कुटुंबातील लोकांनीच ते लग्न जमवले होते. मात्र त्या आगोदर अपघातात त्याचा मृत्यू झाला असल्याने सगळीकडून हळहळ व्यक्त होत आहे.**

# सचिवांच्या आदेशानंतरही रद्द शाळांच्या पुनर्मूल्यांकनाचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** धनगर समाजातील विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यम निवासी शाळांबाबत बहुजन कल्याण विकास विभागात मोठा वाद निर्माण झाला आहे. सचिवांनी स्पष्ट आदेश देऊन संबंधित संस्थांची मान्यता नाकारली असतानाही संचालकांनी पुन्हा गुणवत्ता तपासणीचे आदेश दिल्याने प्रशासकीय पातळीवर खळबळ उडाली आहे.

राज्यातील २५ निवासी शाळांनी कागदोपत्री विद्यार्थ्यांची संख्या दाखवून कोट्यवधी रुपयांचा निधी लाटल्याचा ठपका ठेवत यापूर्वी त्यांची मान्यता रद्द करण्यात आली होती. त्यानंतर संस्थाचालकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार संबंधितांना सुनावणी देण्याचे आदेश दिले होते.

### बहुजन कल्याण विभागाचा 'अजब' कारभार

न्यायालयाच्या आदेशानंतर बहुजन कल्याण विकास विभागाच्या सचिवांनी सर्व संस्थांची सविस्तर सुनावणी घेतली. या सुनावणीत संस्थाचालकांचा युक्तिवाद फेटाळण्यात आला आणि मागील निर्णय कायम ठेवत सर्व संस्थांची परवानगी नाकारण्यात आली.

सचिवांनी आदेशात नमूद केले होते की, संस्थांनी चुकीची आकडेवारी सादर करून शासनाची दिशाभूल केली. विद्यार्थ्यांना योजनेचा योग्य लाभ मिळाला नाही. शासनाचे आर्थिक नुकसान झाले असून ते विनाविलंब वसूल करावे. संबंधित संस्था आणि शाळांविरुद्ध कायदेशीर कारवाई करून अहवाल शासनास सादर करावा.सचिवांचे एवढे स्पष्ट आदेश असतानाही विभागाच्या संचालकांनी पुन्हा एकदा या शाळांचे गुणवत्ता मूल्यांकन करण्याचे आदेश दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे रद्द **(पान ४ वर)**

# घोडनदी प्रदूषण; नागवडे कारखान्याला २.३२ कोटींचा दंड

## हरित लवादाचा दणका : प्रतिबंधात्मक उपायांसाठी ७५ लाख आणि सुधारणात्मक कामांसाठी ५१ लाख रुपये खर्च करण्याचे निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर–** आजसर्वत्र भेदभाव निर्माण करणारे, द्वेषाचे, भिती दाखवण्याचे वातावरण जाणिवपूर्वक निर्माण केले जात आहे. जातीपातीच्या, धर्माच्या भिंती उभ्या करून माणसा–माणसातील प्रेम, जिव्हाळा संपवला जात आहे. सर्वत्र द्वेषाची भावना वाढीस जात असताना अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सौंदाळा या गावाने ग्रामसभेत जातमुक्तीचा ठराव मंजूर करून एक वेगळा आदर्श घालून दिलेला आहे, हा आदर्श राज्यात सर्वदूर पोहचला पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी अहिल्यानगरच्या नेवासा तालुक्यातील





जातमुक्त सौंदाळा गावाला भेट देऊन गावकऱ्यांचे अभिनंदन करत संवाद साधला. यावेळी सौंदळ्याचे सरपंच शरद आरगडे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी, सरचिटणीस प्रभावतीताई घोगरे, अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सचिन गुजर, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, अभिजीत लुनिया, जिल्हा सरचिटणीस रंजन जाधव, नेवासा तालुकाध्यक्ष नानासाहेब पठारे, महिला जिल्हाध्यक्ष लताताई डांगे, शिर्डीचे शहराध्यक्ष सचिन चौगुले, पाथर्डी तालुकाध्यक्ष नासिर शेख तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रमस्थांशी संवाद साधताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प जगाला भिती घालत आहेत, युद्धाची धमकी देत आहे. देशात व राज्यातही भेद निर्माण करणारे, भितीचे वातावरण पसरवणारे अनेक प्रवाह आहेत. अशा वातावरणात सौंदाळा गावाने जातमुक्तीचा ठराव करून 'डरो मत' चा संदेश दिला आहे. खरे तर जाता जात नाही ती जात, धर्म बदलता येतो पण जात बदलता येत नाही. मुलाला शाळेत प्रवेश घ्यायचा म्हटले की आधी जात लिहावी लागते. आज जातीपातीच्या भिंती अधिक गडद होऊ लागल्या आहेत. बीड जिल्ह्यात संतोष देशमुख यांची निघृण हत्या **(पान ४ वर)**

**सौंदाळा गावाने एकता, समता आणि बंधुभाव यांचा संदेश देत खूप मोठे पाऊल टाकले असून आज राष्ट्रसंत गाडगे महाराजांची जयंती आहे. गाडगेबाबा हे स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, सामाजिक न्याय आणि मानवतेचे प्रबोधन करणारे थोर संत होते. त्यांच्या विचारांशी पूर्णपणे जुळणारा हा निर्णय म्हणावा लागेल. अज्ञान, भेदभाव आणि अस्वच्छतेविरुद्ध लढणाऱ्या गाडगे बाबांच्या मार्गावरच सौंदाळा गाव चालत आहे. गढूळ झालेल्या वातावरणात सौंदाळा गावाने तुरटी फिरवण्याचे काम केले आहे असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.**

## संपादकीय

# नक्षलवाद : सुरक्षेपलीकडे विकासाचे आव्हान

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठीचे सुरक्षात्मक उपाय निश्चितच परिस्थिती नियंत्रणात आणतात; पण सामाजिक-आर्थिक विषमतेच्या मुळाशी जाऊन समस्या सोडवण्याचे काम मात्र 'विचारपूर्ण दृष्टिकोन' आणि 'समतोल विकास'च करू शकतो. भारतातील नक्षलवादी चळवळीचे उदाहरण याच सत्याची साक्ष देत आहे. तब्बल अकरा राज्यांमध्ये पसरलेली आणि साठ वर्षांपेक्षा अधिक काळ टिकलेली ही हिंसक चळवळ आता शेवटच्या घटका मोजत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. हे यश केवळ सुरक्षा दलांच्या कठोर कारवाईचे फलित नाही, तर आदिवासी समाजातील बदलत्या मानसिकतेचे आणि सरकारच्या धोरणात्मक दृष्टिकोनाचेही परिणाम आहे. प्रखर इच्छाशक्ती असली की कठीण उद्दिष्टेही साध्य करता येतात, याचे हे ज्वलंत उदाहरण आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नक्षलवादाच्या उच्चाटनाचा निर्धार जाहीर केला तेव्हा अनेकांना ते अवघड वाटले होते. ३१ मार्च २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करून त्यांनी एक कालबद्ध योजना आखली. आता ती मुदत जवळ येत असतानाच नक्षलवाद्यांच्या प्रमुख नेत्यांकडून शस्त्रत्यागाचे सत्र सुरू झाले आहे. तेलंगणातील चंद्राण्णा, मध्य प्रदेशातील कबीर, आंध्र प्रदेशातील बडसे सुक्का ऊर्फ देवा, महाराष्ट्रातील सोनू ऊर्फ भूपती आणि नुकतेच तेलंगणातील देवजी यासारख्या नेत्यांनी शरणागती पत्करली. हजारो नक्षलवाद्यांनीही याच मार्गाचा अवलंब केला आहे. हे सर्व यातून या चळवळीची कालबाह्यता आणि अपयश अधोरेखित होते. खंबीर सुरक्षा उपाययोजनांसोबतच, ज्या आदिवासींच्या शोषणाविरोधात ही चळवळ उभी राहिली होती, त्यांच्यातूनच पाठिंबा कमी होणे हे या शरणागतीचे मुख्य कारण आहे.

नक्षलवादाच्या सुरुवातीच्या दिवसांत आदिवासींच्या न्यायाच्या स्वप्नांना हात घालण्याचे उद्दिष्ट होते. पण कालांतराने ही चळवळ विकृत झाली. ज्यांना न्याय देण्याचे वचन दिले होते, त्यांच्याच विरोधात शस्त्रे उगारली गेली. पोलिसांचे खबरे असल्याच्या संशयावरून अनेक आदिवासींचीच हत्या करण्यात आली. चळवळ टिकवण्यासाठी विकासप्रक्रियेत अडथळे निर्माण करणे हे एका विकृत मानसिकतेचे लक्षण आहे. विकासाची गंगा आदिवासी भागांत पोचू नये म्हणून रस्त्यांखाली भूसुरुंग पेरले गेले. निवडणुकांवर बहिष्कार घालण्यात आला. छत्तीसगड, झारखंडसारख्या राज्यांत पोलिस आणि सुरक्षा दलांवरील हल्ले नित्याचे झाले होते. राजकीय नेत्यांच्या हत्या, अपहरणनाट्ये यामुळे 'लाल साम्राज्या'ची दहशत सर्वत्र पसरली होती.

साधारण २००० पासूनचा कालखंड विचारात घेतला तर नक्षलवाद्यांच्या हिंसाचारात १२ हजारांपेक्षा अधिक लोकांचा बळी गेला आहे. यात नक्षलवादी, सुरक्षा रक्षक आणि सर्वसामान्य नागरिकांचाही समावेश आहे. केवळ जीवितहानीच नव्हे, तर आर्थिक नुकसानही प्रचंड झाले. महाराष्ट्र, छत्तीसगड, झारखंड, आंध्र प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, ओडिशा आणि पश्चिम बंगालसारख्या राज्यांत अनेक भागांत विकासप्रक्रिया ठप्प झाली. रस्ते, शाळा, रुग्णालये यांची उभारणी रखडली. आदिवासींच्या आकांक्षा आणि स्वप्नांना या हिंसेने विझवले. पण आता तरुण पिढीला सशस्त्र संघर्षातून काहीही मिळत नाही, हे पटले आहे. जंगलातील प्रत्येक सळसळ संशयास्पद वाटणाऱ्या नक्षल नेत्यांनीही हे बदलते वारे ओळखले. सुरक्षा दलांच्या गोळीबारापूर्वीच अनेकांनी शस्त्रे खाली ठेवली. देशांतर्गत सुरक्षेच्या दृष्टीने हे एक मोठे स्थित्यंतर आहे. केंद्र आणि राज्य सरकारांना या भागातील पोलिस बंदोबस्तासाठी आतापर्यंत ६ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करावा लागला आहे. हा आकडा दिवसागणिक वाढतच होता. हा पैसा विकास आणि उत्पादक कामांसाठी वापरता आला असता. आता या खर्चात कपात होण्याची शक्यता आहे, हे स्वागतार्ह आहे. पण नक्षलवादासारख्या चळवळींना 'इंधन' पुरवते ते भ्रष्ट आणि असंवेदनशील प्रशासन. नोकरशाही, वनखाते आणि स्थानिक अधिकारी जर लोकाभिमुख, कार्यक्षम आणि उत्तरदायी असते, तर ही चळवळ एवढी पसरलीच नसती. आता तरी या घटनेतून बोध घेण्याची गरज आहे का?

शरणागत नेत्यांपैकी एकाने म्हटले आहे, 'शस्त्रे टाकली तरी विचार संपलेला नाही.' ही विधाने गंभीर आहेत. राजकीय नेतृत्व आणि प्रशासनाने याची दखल घ्यायला हवी. नक्षलवाद संपला म्हणजे सगळ्या समस्या संपल्या, असे नाही. ज्यांनी शस्त्रे खाली ठेवली, त्यांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. आदिवासींच्या जल, जंगल आणि जमिनीवरील अधिकार अबाधित ठेवणे हेही तितकेच महत्त्वाचे. या नक्षलपीडित राज्यांत दुर्मीळ खनिजसंपदा प्रचुर आहे, जी चौथ्या औद्योगिक क्रांतीचे इंधन आहे. उद्योगसंस्थांचे या भागाकडे लक्ष आहे. पण नक्षलवादाची साफसफाई ही केवळ उद्योगांना 'मोकळे रान' देण्यासाठी नसावी. अन्यथा हे यश अल्पकालिक ठरेल.खरा आव्हान आहे तो विकासाच्या मुळाशी जाण्याचा. कायदा-सुव्यवस्थेसाठीचे उपाय परिस्थिती नियंत्रित करतात, पण मूळ समस्या सोडवण्यासाठी 'विचार' आणि 'समतोल विकास' आवश्यक आहे. आदिवासी भागांत विकासकामे, रोजगारनिर्मिती, शिक्षण आणि पायाभूत सुविधांवर भर द्यावा लागेल. संवाद आणि पुनर्वसन धोरणे प्रभावीपणे राबवावीत. शरणागतांचे पुनर्वसन तर करावेच, पण स्थानिक आदिवासींना रोजगार देत त्यांची जंगलातील संसाधने हिरावली जाणार नाहीत, हेही सुनिश्चित करावे. हे आव्हान गुंतागुंतीचे आहे, पण सरकारच्या प्रखर इच्छाशक्तीने ते पेलता येईल. नक्षलवाद्यांची शरणागती हा दिलासादायक 'अर्धविराम' आहे; पूर्णविरामासाठी विकासाची प्रक्रिया गतिमान करावी लागेल.

# प्रवराकडून ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळेचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : गरीबातल्या गरीब विद्यार्थ्याला शिक्षण मिळावे. शिक्षणातून पुढे जावे. हा दृष्टिकोन पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांचा होता आणि याच दृष्टीने ग्रामीण भागामध्ये प्रवरेच्या माध्यमातून शिक्षण संस्था त्यांनी सुरू केल्या. या माध्यमातून त्यांचा वारसा जतन करत संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, विखे कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे यांच्या मार्गदर्शनातून पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात राज्यभरातून येणाऱ्या ऊस तोडणी कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा हा उपक्रम लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून राबवला जातो.

या उपक्रमातून ऊस तोडणी मजुरांच्या मुलांना शिक्षणाचे धडे मिळावेत आणि यातूनच त्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी हा प्रयत्न संस्थेच्या प्रवरा शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या माध्यमातून यशस्वीपणे अनेक वर्षापासून राबवला जात असल्याची माहिती प्राचार्य डॉ.सचिन भोसले यांनी दिली.

ऊस तोडणी निमित्ताने प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात राज्यभरातून मजूर येतात. त्यांच्यासोबत त्यांचे मुलेही असतात, परंतु आई - वडील कामावर गेल्यानंतर ही मुले घरी एकटीच असतात, त्यांची शाळा तुटते. अशा विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी मागील दोन वर्षापासून साखर शाळेचे आयोजन बी.एड. महाविद्यालयातर्फे केले जाते.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ यावर्षीही साखर शाळेचा उपक्रम बी.एड. महाविद्यालयातर्फे राबविण्यात आला. यावेळी बी.एड. महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थी ऊस तोडणी कामगारांच्या मुलांना अक्षर ओळख, वाचन, लेखन या शिक्षणातील मूलभूत क्षमता शिकवतात. या मुलांसाठी शैक्षणिक साहित्य, त्यामध्ये वही, पेन आणि अंकलिपी यांचे वाटप बी.एड. प्रशिक्षणार्थी यांच्याकडून देण्यात आले.ऊस तोडणी कामगारांच्या मुलांमध्ये स्वच्छतेची सवय लागावी म्हणून त्यांना टूथब्रश आणि टूथपेस्ट यांचे वाटप करून त्याच्या वापराचे प्रशिक्षणही देण्यात आले. या उपक्रमामुळे आमच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण झाली, असे मत कारखान्याच्या परिसरातील ऊस तोड मजुरांच्या कुटुंबाने व्यक्त केली.

महाविद्यालयातील प्रा. नयना औताडे यांनी साखर शाळा उपक्रमाच्या संयोजक म्हणून सर्व नियोजन केले आहे. या उपक्रमाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे, सहसचिव भारत घोगरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, अतांत्रिक विभागाचे शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, कॅम्पस डायरेक्टर डॉ. महेश खर्डे यांनी विशेष कौतुक केले.



# शेतकरी विरोधी सरकारचा पुणतांब्यात तीव्र निषेध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : शेतकऱ्यांना मोठमोठी आश्वासने देऊन शेतकरी वर्गाची दिशाभूल करणाऱ्या राज्यातील सरकारचा पुणतांबा येथील शेतकरी वर्गाने शेतकरी विरोधी सरकारच्या विरोधात घोषणा देऊन तीव्र शब्दात निषेध केला पुणतांबा येथील शेतकरी वर्गाने शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी १ जून२०१७ रोजी शेतकरी संपा सारखे अनोखे आंदोलन करून राज्याचे नव्हे तर संपूर्ण देशाचे लक्ष वेधले होते.

शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करावे शेतमालाला हमीभाव मिळाला पाहिजे दूधाचे भाव वाढले पाहिजे दिवसा सलग १२ तास शेतीला वीजपुरवठा केला पाहिजे सातबारा कोरा झाला पाहिजे यासह अनेक मागण्यासाठी आंदोलन केले होते. त्यावेळचे तात्कालिक व विद्यमान मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी अद्यापही आश्वासनांची पूर्तता केली नाही. काल विधानसभेचे अधिवेशन सुरू झाले. विरोधकांनी ह्या विषयावर सरकारला धारेवर धरले आहे, तर पुणतांबा येथील शेतकऱ्यांनी सुध्दा काल ११ वाजता ग्रामपंचायत इमारती जवळ एकत्र येऊन बळीराजाच्या पुतळ्याला अभिवादन केले व लबाड सरकारचा निषेध केला.

यावेळी शेतकरी संपातील मुख्य शिलेदार डॉ. धनंजय धनवटे बाळासाहेब चव्हाण, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख सुहास व हाडणे, भास्कर मोटकर, सुनिल थोरात, सुनिल थोरात, श्याम धनवटे, गणेश बनकर सह मोठया संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

यावेळी सुहास व हाडणे बाळासाहेब च०हाण यांनी सरकारच्या धोरणावर सडकून टिका केली सरकारने शेतकरी वर्गाच्या प्रश्नाबाबदलवकर निर्णय घेतला नाही तर पुणतांबा येथील शेतकरी अधिवेशनाच्या ठिकाणी येऊन अनोखे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# गो-तस्करांवर मोक्का अंतर्गत कारवाईची करा : मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील सराईत कसाई व गोवंश तस्करांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी बजरंग दलाच्या वतीने उपविभागीय पोलिसअधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्याकडे निवेदनाद्वरे करण्यात आली आहे.

पोलीस उपाधीक्षक डॉक्टर कुणाल सोनवणे यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर जिल्हा हा ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभलेला भाग असून, संगमनेर शहर व तालुक्यात गेल्या काही काळा पासून गोहत्येचे आणि अवैध मांस विक्रीचे जाळे सक्रिय झाले आहे. स्थानिक पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेकडून (एलसीबी) अनेकदा कारवाई करून गोवंशाची सुटका करण्यात आली असली तरी, संबंधित सराईत आरोपी जामिनावर सुटून पुन्हा गुन्हे करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर संबंधित आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करत महाराष्ट्र विघातक कृत्ये प्रतिबंधक कायदा (चझ्ऱ्अ) तसेच महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (चउजउअ) अंतर्गत गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच तालुक्यातील सर्व संशयित गो-तस्कर व कसाई यांची यादी तयार



करून त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी, जेणेकरून गोवंश हत्या पूर्णपणे थांबेल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, वेळेत कठोर पावले उचलली नाहीत तर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. हे निवेदन ऋषिकेश भागवत (गोरक्षा प्रमुख, महाराष्ट्र प्रदेश) यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले असून, विहिंप-बजरंग दल संगमनेर प्रखंडाचे कुलदीप ठाकूर, सुरेश कालडा, ओमकार भालेराव, कृष्णा डंबीर अनिकेत पवार, सागर पाटील, आकाश बनकर, चिराग साहू, साई ठाकूर, संतोष भोसले, गौरव वराडे, श्रीकांत मोरे आदींच्या सह्या आहेत. निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री व गृहमंत्री, पालकमंत्री, पोलिस अधीक्षक आदींनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# नेपाळी आचाऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील सलाबतपूर शिवारात एका नेपाळी स्वयंपाक्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली असून परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गणेश (वय अंदाजे ४५ ते ५०) हा सलाबतपूर येथील रवी राम तांबे व आदेश बाळासाहेब देशमुख यांच्या 'हॉटेल ७/१२' येथे आचारी म्हणून काम करत होता. दि. २२ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे १२.५० वाजण्याच्या सुमारास संतोष दिलीप खुळे यांच्या शेतातील आंब्याच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत तो आढळून आला.

घटनेची माहिती मिळताच नेवासा पोलीस स्टेशनचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेण्यात आला आहे. शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, मयत व्यक्तीबाबत हॉटेल मालकांकडे कोणतीही ठोस माहिती उपलब्ध नसल्याने त्याच्या नातेवाईकांचा शोध सुरू आहे. ओळख पटेपर्यंत मृतदेह राखून ठेवण्यात आला आहे. संबंधित व्यक्तीची ओळख पटल्यास नागरिकांनी नेवासा पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# वाचनालयाच्या वतीने संत गाडगेबाबा जयंती साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथील सावित्रीबाई फुले फातिमा शेख सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने संत गाडगेबाबांची जयंती साजरी करण्यात आली. समाजसेवाची गुढी अंगी उभारून घराबाहेर पडलेले समाज सुधारक संत गाडगेबाबा यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन प्रबोधनाची आज समाजाला खरी गरज असल्याचे प्रतिपादन नगरपंचायतचे कार्यालयीन अधिक्षक सागर झावरे यांनी यावेळी बोलतांना केले.

सावित्रीबाई फुले फातिमा शेख सार्वजनिक वाचनालय यांच्या वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रम संयोजक विकास चव्हाण यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करून गाडगेबाबा यांचे जीवनकार्य विषद केले.

यावेळी नेवासा नगरपंचायतचे नगरसेवक संभाजी धोत्रे, डॉ. राहुल चव्हाण, स्वीकृत नगरसेवक राजेंद्र काळे, सामाजिक कार्यकर्ते धनूभाऊ काळे, नगरसेवक जालिंदर गवळी, दिनेश व्यवहारे, बाबासाहेब लष्करे, हर्षल चव्हाण, यश चव्हाण उपस्थित होते. आलेल्या सर्व मान्यवरांचा सत्कार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विकास चव्हाण यांनी केले. डॉ. राहुल चव्हाण यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.



# तरवडी जि प शाळेच्या १०० विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भेंडा** : नेवासा तालुक्यातील तरवडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या १०० विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. मनोहर बोराटे यांच्या अध्यक्षतेखाली तरवडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झालेल्या कार्यक्रमास मेजर संपत शिंदे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर दरवडे, सावता परिषद जिल्हा उपाध्यक्ष सचिन जगन्नाथ दरवडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष बाळासाहेब पाटील, जनार्धन भालेराव, सोपानराव नलगे, एकनाथ वडगे, वृक्षमित्र शंकरराव कन्हेरकर,




बाबासाहेब बोरुडे, अनिल नाईक, राजू पाटील, जमाल सय्यद,शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी चव्हाण, शिक्षिका वैशाली जाधव, अर्चना भालसिंग यांचेसह माजी विद्यार्थी संघटनेचे सर्व सदस्य व शिक्षकवृंद उपस्थित होते.स्कूल बॅगचे वाटपासाठी 'माझी शाळा माझा अभिमान ' अंतर्गत मेजर संपत नामदेव शिंदे यांनी स्वखर्चातून निधी उपलब्ध करून दिला.

यावेळी बोलताना मेजर शिंदे म्हणाले की,आपण या शाळेतून शिक्षण घेतले असून समाजा प्रती व शाळेप्रती आपले काहीतरी देणे लागते. त्या भावनेतून सर्व विद्यार्थ्यांना मोफत स्कूल बॅग देण्याचा छोटासा प्रयत्न केला आहे. कार्यक्रमा दरम्यान ज्येष्ठ व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.

शिक्षिका मनीषा धानापुणे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलनकेले. माधवी संगम यांनी आभार मानले.

**रमजानुल मुबारक २०२६**
**रोजा नंबर ०७**

# ' रोजा सोडताना खजूर च का? दडलंय आरोग्याचं मोठं गुपित'

पैगंबर मुहम्मद स्व. सांगतात, रोजा इफ्तार हा खजूर नें करावं, कारण खजूर मध्ये बारकत आहेत ! अगर खजूर नसेल तर पाणी पिऊन रोजा इफ्तार करा ''. ( हादिस तिर्मिझी ०६५७).जगभरातील कोट्यावधी मुस्लिम रमजान महिन्यात आपला रोजा( उपवास ) ''इफ्तार ''( सोडताना ) करतांना खजूर खाऊन करतात. महिनाभर चालणाऱ्या रमजान मध्ये पहाटे पासून ते संध्याकाळ पर्यंत काहीही न खाता पिता निरंकारी राहून दिवसभर आत्मचिंतन करतात. रोजा सोडताना खजूर खातात. पैगंबर मुहम्मद स्व. यांनीच खजूर खाण्यास सांगितले. खजूर खाण्यामागे फक्त श्रद्धा नाहीत तर आरोग्याची मोठी गुपित दडलेली आहेत, दिवसभर उपाशी राहिलेल्या शरीराला लगेंच ताकद देण्यासाठी खजूर हें जगातील सर्वात उत्तम फळ मानले जाते. खजूर ( फिनिक्स डेक्टिफिफेरा ) प्रामुख्याने इंग्रजीत ''' डेट'' वरींश म्हणतात. प्रामुख्याने अरबस्थानात,आशियाई, आफ्रिका संबंधित फळ वर्गीय आहेत, अरब व आफ्रिका उष्णता वातावरणातील मुख्य भरपूर उत्पन्न देणारं पीक आहेत, याला व्यापारी वास्तू म्हणून मान्यता आहेत.अन खास म्हणजे व्यापार मोठया प्रमाणात होतो. याचे (१)मेडजूला, (२)डेंगलेत, (३)बराहीं, (४)जाहिदी, (५)हलवा व (६)आजवा खजूर असें विविध प्रकार आहेत. त्यामध्ये '' आजवा '' खजूर अख्या जगात लोकप्रिय आहेत. अरबस्थान, आफ्रिका, आशियाई व जगात ' '' ''सुपर फूड '' म्हणून जगात लोकप्रिय होत आहेत. खजूर मधील पोषण मूल्य शंभर (१०० ग्राम )ग्राम खजूर मध्ये,(१) उरअॅलेहूवअॅरींश कार्बहैद्राते :- ७५ मिली ग्राम,)(२) (शुगर साखर :- ६३ मिली ग्राम )(३) वसा :- ०.२ मिली ग्राम, (४) लरश्रेअॅळशी उष्मान्क :- २७७ किलो कॅलारी, (५),फायबर :-७ ग्राम आहेत (८)प्रोटीन :- ७ ग्राम (९) आयर्न ०.९ ग्राम ( १०) पोटॅशिअम :- ६५५ मिली ग्राम,इतर . मॅग्नेशिम, रपींळेुळवरपीं अंतिऑक्सिदंत, फॉस्परस, झिंक, सल्फर, पोटॅशियम, नुरोजेणेरेटिव्ह, कॅलसियम, फ्लॅवोनोंइडस करोटीनाईस, फ्लेवोनोंएडस सारखी अँटीऑक्सिदंत,इत्यादी. ब्रिटन मधील प्रसिद्ध आहार तज्ञ शहेंनाझ बशीर स्वतः रोजा ठेवून सांगतात, जेंव्हा आपण उपवास ''इफ्तार '' सोडतो, त्यावेळी आपल्या शरीराला सर्वात आधी '' ग्लुकोज ''ची गरज असते. कारण त्यातूनच आपल्याला ताकत ( शक्ती ) मिळते '' इतर कोणत्याही पदार्थाच्या तुलनेत खजूर मधील नैसर्गिक साखर आपल्या रक्तातील शुगर लेव्हल लगेंच वाढवते. बाकीचे पदार्थ पचवायला व त्यातून ऊर्जा मिळायला वेळ लागतो. शाहेनाझ बशीर यांच्या मते खजूरचं खरं गुपित हें आहेत की,साध्या साखरे बरोबरच शरीराला आवश्यक असलेले उरअॅलेहूवअॅरींश कार्बहैद्राते हीं भरपूर प्रमाणे आहे. त्यामुळे शरीराला दिवसभर पुरेल इतकी ताकत हळूहळू मिळत राहाते इतर वेळी हीं बरेच लोकं दिवसभर त्यांच्या साठी हीं हें एक वरदानच आहेत. त्यामध्ये व्हिटॅमिन बी ६ ( इ६), व्हिटॅमिन (अ ए ), आणि व्हिटॅमिन ज्ञ कें सोबत भरपूर प्रमाणात आयरन ( ळअॅप ) त्यामुळे कमी वेळात शरीराला आवश्यक असलेले सर्व पोषक घटक मिळून थकवा लवकरच दूर होतो. दिहैद्राशन (ृशहूवअॅरींळेप ) पासून खास बचाव खजूराची खास किमया :- सुखा मेवे सारखं असलेतरी शरीरातील पाण्याची पातळी टिकवून ठेवण्यास खुप मदत करते, कारण यात नैसर्गिकरित्या पोटॅशियम असल्यामुळे शरीरातील इलेक्ट्रॉलाईट बॅलन्स सांभाळून पाणी संपूर्ण पेशी पर्यत पोहचवण्यास मदत करते. रोजा (उपवास )इफ्तार करतांना बहुतेक जन खजूर बरोबरच पाणी एकत्र घेतात म्हणून ऊर्जा मिळवण्यासाठी शरीरातील पाण्याचे प्रमाण भरून काढण्यासाठी हें उत्तम कॉम्बिनेशन आहे. त्यामुळे बाहेरून वेगळे इलेक्ट्रॉलईट घेण्याची गरज भासत नसते. बऱ्याच मंडळीणा वाटतं की रमजान मध्ये आपलं वजन कमी करू या, परंतु इफ्तार मध्ये भरपूर खाल्लं तर उलटं वजन वाढू शकतो, म्हणून नियोजन करून खजूर ०१, ०३,०५ विषम संख्येत खजूर खाऊन इफ्तार करून लगेच नमाज अदा करण्यासाठी जाताय म्हणून त्या नमाजच्या हलचली मुळे चांगला व्यायाम होत असल्यामुळे शरीर खजुरातील फायबर ( तंतुमय पदार्थ ). पाचवायला सुरुवात करतो. आहार तज्ञ शहेंनाझ बशीर सांगते, '' खजूर खाल्यामुळे शरीराला एक सिग्नल मिळतं की अन्न पोटात गेलय आणि पचन हीं सुरू झालंय. '' म्हणून नमाज अदा नंतर जेंव्हा आपण जेवायला बसतो तेंव्हा उगाचच जास्त खाण्याची इच्छा च होत नाहीं म्हणून आपलं वजन नियंत्रनात राहतं. रोजा ठेवणाऱ्यानां प्रामुख्याने पोटाचा त्रास होण्याच प्रमाण बरेच असतं त्यामध्ये बध्यकोष्ठाता ( लेपींळरींळेप. खपवळसशींळेप, शींल )पोट फुगल्या सारखं वाटतं, दिवसभर रिकाम असल्यामुळे आतड्याची हलचाल मंदावते. खजूर मध्ये भरपूर फायबर ( तंतुमय ) ( ७ सात ग्राम )पदार्थ असल्यामुळे पचना साठी उपयोग होतो, निरोगी राहण्यासाठी दिवसभर आहारात ३० ग्राम फायबर असनं गरजेचं आहे. आहार तज्ञ शहेंनाझ बशीर सांगतात की खाजुरीला फक्त रोजा पुरतंच मर्यादित ठेवू नका आपण दैनंदिन आयुष्यात दिवसाची सुरुवात हीं बिस्कीट व बेकरी पदार्थ नें करण्यापेक्षा दोन -तीन खजूरीने करून बघावं नक्कीच त्याचे फायदे होतील. धार्मिक कारणा व्यतिरिक्त आरोग्यासाठी हीं अधून मधून उपवास करणं लोकप्रिय होत आहेत.. आणि जर रमजान मध्ये ज्या प्रमाणे उपवास करतो त्याप्रमाणेच करावं. खजूर हा फायबर चा उत्तम नैसर्गिक श्रोत आहेत. आहार तज्ञ शहेनाझ बशीर सांगतात, '' खजूर आणि दुध एकत्र मिसळा त्यात थोडे दहीं आणि काजू घालून मिसळून प्यावे '' अरब लोकं खजूरला दूध दही रोटीसह कधी कधी लोणी आणि मासे बरोबर खातात. अरब लोकं खजूर मधील बी काढून त्यात लोणी ( मख्खन )भरून खातात. '' खजूर एक उत्तम अन्न आहेत जें अनेक आजारावर व महत्वाच्या गरजा पुर्ण करते ''



**डॉ. सलीम शेख**
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

## शिवा ट्रस्ट शैक्षणिक संकुल येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील वडाळा महादेव येथील शिवा ट्रस्ट शैक्षणिक संकुल येथे वार्षिक स्नेहसंमेलन २०२६ व गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित निबंध स्पर्धेच्या पारितोषिकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत तालुक्यातील १८ शाळांतील ३२५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रथम क्रमांक वैष्णवी लांडे हिने पटकावला. दोन दिवस चाललेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाळासाहेब पवार व संचालक दिलीपदादा पवार होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये पंचायत समितीचे आरोग्य अधिकारी डॉ. मोहन शिंदे, विविध विभागांचे अधिकारी व पोलीस प्रशासनातील मान्यवर उपस्थित होते. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये विविध परीक्षांत व क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच संकुलातील विविध महाविद्यालयांतील उत्कृष्ट शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनाही गौरविण्यात आले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत वैष्णवी लांडे प्रथम



**शिरसगाव** : शिवा ट्रस्ट शैक्षणिक संकुल वडाळा महादेव यांच्या वतीने आयोजित उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांच्या जीवनचरीत्रावर तालुकास्तरीय निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेमध्ये खा. गोविंदराव आदिक ग्रामीण शिक्षण संस्था संचलित कै. रघुनाथ कृष्णाजी औताडे विद्यालय माळेवाडी विद्यालयाची विद्यार्थिनी वैष्णवी लहानू लांडे हिने प्रथम क्रमांक मिळविला त्याबद्दल तीला रोख रक्कम ५००१, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तिच्या या यशा बद्दल संस्थेचे सचिव अविनाश आदिक, सहसचिव जयंत चौधरी, माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितीन पवार व सर्व गव्हर्निंग कौन्सिल सदस्य व विद्यालयाचे प्र. मुख्याध्यापक कुंडलीक शिरोळे सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वृंद व सर्व ग्रामस्थ माळेवाडी यांनी तिचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## श्री संत गाडगे महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर येथील कांदा मार्केट परिसरातील श्री संत गाडगे महाराज मंदिर या ठिकाणी सालाबादप्रमाणे जयंती उत्सव या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सकाळी जलाभिषेक तसेच मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी स्वाध्याय परिवाराचे कचरू निकम शिवाजी आहेर, प्राचार्य टि ई शेळके, प्रा डॉ बाबुराव उपाध्ये, प्रा शिवाजीराव काळे, प्राचार्य भाऊसाहेब भवार, महसूल विभागाचे सुनील देसाई, प्रदेश उपाध्यक्ष दीपक दळवी, राजेंद्र नारायणे, पोपट नलावडे, संजय त्रिभुवन, पुंडलिक खैरनार, संजय भागवत, संजय रोकडे, यावेळी उपस्थित होत्या. यावेळी हरिपाठ व भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला महाप्रसाधाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. उपस्थित सर्वांचे गौतम शिरसाठ यांनी आभार मानले.

## डेप्युटी कंट्रोलर राज्य अन्न व नागरी पुरवठा अधिकारी यांची मुळा कारखान्यास भेट



**सोनई** : आज मुळा सहकारी साखर कारखाना येथे सिंग डेप्युटी कंट्रोलर महाराष्ट्र राज्य अन्न व नागरी पुरवठा अधिकारी तसेच त्यांच्या समवेत गावडे निरिक्षक अन्न व नागरी पुरवठा अधिकारी व ज्ञानेश्वर कारखान्याचे अशोक अरगडे हे कामानिमित्ताने कारखान्यावर आले. यावेळी त्यांचा सन्मान करताना मुळा कारखाना राष्ट्रीय साखर कामगार युनियनचे अध्यक्ष अशोक पवार, सरचिटणीस डी एम निमसे तसेच कारखान्याचे चिफ इंजिनिअर दिपक नवले, चिफ केमिस्ट सतिश देशमुख यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

## घोडेगावातून मोटर सायकल चोरी

**सोनई** : नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथील आठवडे बाजाराच्या निमित्ताने भाजीपाला आणण्यासाठी बाजारात गेलो असता मांडे मोरगव्हाण रोडवरील डॉ. भालेराव यांच्या हॉस्पिटल शेजारी लावलेली गाडी बाजार करून येईपर्यंत अज्ञात चोरट्यांनी वीस हजार रुपये किमतीची हिरो होंडा काळ्या कलरची चक १७-इठ-५१५६, रुपये २०००० किमतीची मोटरसायकल चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत सोनई पोलीस ठाण्यात भाऊसाहेब रखमाजी जरे रा. झापवाडी यांनी चोरीच्या गाडीची फिर्याद दाखल केली आहे. गुन्हा रजि. क्र. ३०२(२) प्रमाणे दाखल केली आहे.अधिक तपास सपो. अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनखाली दत्तात्रय गावडे तपास करत आहे.

## मुक्ताई ज्ञानपीठात आज धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**पुणतांबा** : योगीराज चांगदेव महाराज समाधी मंदिर परिसरात असलेल्या मुक्ताई आश्रमात मुक्ताई वर्धापन सोहळ्या निमित्त विविध आज धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मुक्ताई ज्ञानपीठाचे मंहत रामानंदगिरी महाराज यांनी दिली आहे. यानिमित्ताने आज सकाळी १० वाजता स्वामी अमृताश्रम महाराज नवगण, बीड यांचे हरिकिर्तन आयोजित करण्यात आले आहे. तसेच दरवर्षी सद्गुरू नारायण गिरी महाराज यांच्या नावाने दिला जाणारा गुरुकृपा पुरस्कार ह्या वर्षी मंहत स्वामी अमृताश्रम महाराज यांना आज सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे किर्तनानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे कार्यक्रमास भाविकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# राजकारण गेलं चुलीत

# बिबट्यांच्या वाढत्या संख्येवर उपाययोजना करा : प्राजक्त तनपुरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : बिबट्याच्या दहशतीमुळे शेतकऱ्यांसह सर्व सामान्य माणसाचे जीवन धोक्यात आले आहे. कुत्रे जसे रस्त्याने फिरतात, काही दिवसातच बिबटे रस्ताने फिरतील, तो दिवस दूर नाही. बिबट्याच्या वाढत्या संख्येवर सरकाने तातडीने उपाय योजना करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करणार, असे प्रतिपादन माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांनी केले. राहुरी शहर व तालूक्यात बिबट्याच्या वाढत्या संख्ये बाबत तसेच शेतकऱ्यांवर बिबट्याचे होत असलेले हल्ले बाबत केंद्र सरकारने वन्य जीव प्राणी कायद्यात बदल करण्यात यावा.



यासाठी माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांच्या नेतृत्वाखाली काल दि. २४ फेब्रुवारी २०२६ रोजी शेतकऱ्यांच्या वतीने शेतकऱ्यांनी सह्या केलेले २० हजार पत्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविण्यात आले. यावेळी बिबट्याच्या हल्ल्यात मयत झालेल्यांच्या नातेवाईकांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच अनेक शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडून बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केली. सुनिल भूजाडी यांनी सांगीतले की शेतमालाला हमीभाव, कर्जमाफी किंवा इतर कोणताही प्रश्न सरकारला विचारला तर एकच उत्तर मिळते, जय श्रीराम असा खोचक टोला भूजाडी यांनी लगावला.

आज सकाळच्या वेळी माजी मंत्री प्राजक्त तनपूरे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकरी नगरपरिषद कार्यालया समोर जमा झाले. त्यानंतर बिबट्याचा पिंजरा, बिबट्याची वेशभूषा धारण केलेला बालक तसेच शेतकऱ्यांनी लिहिलेले २० हजार पत्र घेऊन शहरातून मिरवणूक काढत शेकडो शेतकरी पोस्ट कार्यालयात गेले. आणि सर्व २० हजार पत्र अधिकाऱ्यांच्या ताब्यात देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवीण्याचे काम केले. या प्रसंगी नगरपरिषदचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे, उपनगराध्यक्ष गजानन सातभाई, नगरसेवक सागर तनपूरे, प्रतिक तनपूरे, प्रशांत डौले, प्रदिप भूजाडी, ड. राहुल शेटे, डॉ. संतोष उदावंत, माजी नगरसेवक सुर्यकांत भूजाडी, नंदुभाऊ तनपूरे, दिपक साळवे तसेच भारत भूजाडी, राजेंद्र बोरकर, बाळासाहेब गिरमे, संतोष आघाव, बाळासाहेब आढाव, विजय तमनर, ज्ञानेश्वर बाचकर, राजूभाई शेख, पांडूभाऊ उदावंत, गणेश कोहकडे, रवींद्र आहेर, किरण साळवे, बंटी धनवटे, निसार आतार, निलेश जगधने, जिवन गुलदगड, सुरेश निमसे, रवींद्र आढाव, अशोक कदम, भाऊसाहेब बिडवे, गणेश घाडगे आदिंसह शेकडो नागरिक उपस्थित होते.

# संत गाडगे महाराज जयंती वृक्षारोपण व महाश्रमदानाने साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सन २०२५/२६ अंतर्गत कोपरगाव तालुक्यातील डाऊच बुद्रुक येथे के. जे. सोमय्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील भूगोल विभाग अंतर्गत ग्राम सर्वेक्षण प्रकल्प तसेच संत गाडगेबाबा जयंती निमित्त ग्राम स्वच्छता व वृक्ष लागवड या उपक्रमाचे आयोजन कोपरगाव तालुक्यातील स्मार्ट ग्राम डाऊच बुद्रुक गावात करण्यात आले.

गाव सर्वेक्षण व गृहभेटी दरम्यान भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांनी मौजे बुद्रुक बु. गावातील प्रत्येक घरोघर जाऊन सर्वे करण्यात आला. सर्वे करताना शासनाच्या विविध योजना राबवून गावात करण्यात आलेल्या विकासाच्या योजना व भविष्यात कुटुंबांना कोणत्या योजना किंवा गरजांची आवश्यकता आहे, याचा परिपूर्ण अभ्यास करून सर्वे केला.




### आजच्या वृक्षारोपण व श्रमदान

कार्यक्रमासाठी सरपंच दिनेश गायकवाड, ग्रामपंचायत अधिकारी विजयसिंह पाटील, भीवराव दहे, के. जे.सोमय्या महाविद्यालयातील भूगोल विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. गणेश चव्हाण, सहाय्यक प्राध्यापक डॉ. साळुंके, प्रा. सोनवणे, प्रा. खंडिझोड, प्रा. संपत माळी, प्रा. जाधव तसेच भूगोल विभागातील वरिष्ठ महाविद्यालयाच्या एकूण ३१ विद्यार्थ्यांनी गांव सर्वेक्षण व ग्रामस्वच्छता अभियानात सहभाग घेतला.

# शतक चित्रपटाचा शो सुरू न केल्यास आंदोलन करू

## शिवसेना-भाजपा महायुतीच्या वतीने चित्रपटगृह व्यवस्थापकास इशारा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त तयार करण्यात आलेला 'शतक' हा चित्रपट देशभरात प्रदर्शित होत असून विविध शहरांमध्ये त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मात्र संगमनेर शहरातील मालपाणी मल्टी प्लस या चित्रपटगृहात अद्याप या चित्रपटाचा एकही शो लावण्यात आलेला नाही. याबाबत शिवसेना-भाजपा महायुतीच्या वतीने नाराजी व्यक्त करत शतक हा चित्रपट चित्रपटगृहात दाखवण्यात यावा. यासाठी चित्रपटगृह व्यवस्थापक यांना निवेदन देऊन लवकरात लवकर हा चित्रपट पूर्ण केल्यास आंदोलन छेडले जाईल असा इशारा भाजपा महायुती युवा सेनेच्या वतीने देण्यात आला आहे. आ. अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना भाजपा महायुती यांच्या वतीने चित्रपटगृह व्यवस्थापकांना निवेदन देत 'शतक' चित्रपटाचे तात्काळ नियमित शो सुरू करण्याची मागणी केली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या समाजकार्याचा इतिहास आणि योगदान जनतेपर्यंत पोहोचावे, हा या चित्रपटाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी नमूद केले. स्थानिक प्रेक्षकांकडून चित्रपटाची मागणी असतानाही तो प्रदर्शित न करणे ही खेदजनक बाब आहे. यावेळी महायुतीच्या वतीने व्यवस्थापनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात येईल, असा इशारा शिवसेना शहर पमुख विनोद सूर्यवंशी भाजप तालुका सरचिटणीस महेश मांडेकर शहर सरचिटणीस भारत गवळी शिवसेना महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख दिपाली वाव्हळ, शिवसेना उपतालुका प्रमुख रंणजीत जाधव, पूजा अरगडे, रणजीत गायकवाड, वरद बागुल, शशांक नामन, युवा सेना उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, तालुकाप्रमुख सुशील शेवाळे, शहरप्रमुख सार्थक शेवाळे, युवती शहरप्रमुख शिवाज्ञा अरगडे अविनाश फटांगरे, प्रणव सातपुते, राहुल पखळे, सुनील चांडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# रोटरीच्या आनंदी रस्ते' उपक्रमास संगमनेरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : रोटरी क्लब संगमनेर तर्फे आयोजित 'रोटरी डे चे औचित्य साधून रोटरी आनंदी रस्ते उपक्रम राबविण्यात आला. लहानांपासून ते आबालवृद्धां पर्यंत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. या कार्यक्रमास संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आ. अमोल खताळ, यांनी भेट देऊन या रोटरीच्या उपक्रमाचे कौतुक केले आनंदी रस्ते या उपक्रमाची संकल्पना रो. दिलीप मालपाणी यांनी संगमनेर मध्ये पहिल्यांदा राबविली. उपक्रमाचे हे दहावे वर्ष आहे.

या उपक्रमामध्ये स्ट्रॉबेरी इंग्लिश मिडियम स्कूल तसेच श्री श्री रविशंकर विद्या मंदिर, शारदा विद्या मंदीर या शाळांनी गायन, पथ नाट्य, मल्लखांब, वादनाचे कार्यक्रम तसेच योगा प्रात्यक्षिक सादर केले. तसेच झुंबा डान्स, ओंकार केसेकर यांच्या विद्यार्थ्यांनी मल्लखांब प्रात्यक्षिक, अरविंद गाडेकर यांची व्यंगचित्र, जय भोले ग्रुपतर्फे भजन सादरीकरण, आदी कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. जायंट गोरिला हा बच्चे कंपनीसाठी प्रमुख आकर्षण होते.



वर्मा आर्टस् चे संचालक अक्षय वर्मा यांनी रस्ते सुशोभिकरणाचे अतिशय कठीण असे काम केले. यावेळी मुलांना खेळणी व खाऊचे वाटप करण्यात आले. आनंदी रस्ते' उपक्रमामुळे संगमनेर शहरात सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, हा उपक्रम पुढील वर्षी अधिक व्यापक स्वरूपात साजरा करण्याचा मानस रोटरीच्या आयोजकांनी व्यक्त केला.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब संगमनेरचे अध्यक्ष विश्वनाथ मालाणी, सेक्रेटरी सौरभ म्हाळस, उपाध्यक्ष महेश वाकचौरे, खजिनदार संकेत काजळे तसेच प्रकल्प प्रमुख समीर शहा, धीरज देशमुख, प्रकल्प समन्वयक अजित काकडे, नरेंद्र चांडक, सीए संजय राठी, दिपक मणियार, राजेंद्र खोसे, भारतभूषण नावंदर, आनंद हासे, विकास लावरे, डॉ. किशोर पोखरकर व रोटरी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. संगमनेरमधील आबालवृद्ध नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचा समारोप पावणे दोन हजार चौरस फूटाचा भव्य तिरंगा फडकावून करण्यात आला. वंदे मातरमच्या जयघोषाने संपूर्ण परिसर देशभक्तीने भारून गेला.

> रोटरी क्लब ऑफ संगमनेर नेहमीच विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात त्याबद्दल मी रोटरी च्या टिमचे अभिनंदन करतो. या कार्यक्रमात लहानांपासून, मोठ्यां पर्यंत, आमच्या लाडक्या बहिंणींसह, बच्चे कंपनी यात सामील झाले आहे. सर्वांचे अभिनंदन करून या आनंदी रस्ते उपक्रमाचे मी कौतुक करतो
>
> **अमोल खताळ, आ. संगमनेर विधानसभा**

# विधवा महिलांना वर्षभर मोफत आरो पाणी

## शहापूर ग्रामपंचायतीचा निर्णय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भेंडा** : नेवासा तालुक्यातील शहापूर ग्रामपंचायतीकडून मागासवर्गीय नागरिकांसाठी स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. गावातील मागासवर्गीय कुटुंबांना मोफत पाण्याचे जार वाटप करण्यात आले असून विधवा महिलांना वर्षभर मोफत आरो फिल्टर पिण्याचे पाणी देण्याचा निर्णय ग्रामपंचायतीने घेतला आहे. या उपक्रमांतर्गत सर्व पात्र कुटुंबांना जारचे वितरण करण्यात आले. तसेच ग्रामपंचायतीमार्फत केवळ पाच रुपयांत २० लिटर शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्याची योजना अविरत सुरू असून ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या शुद्ध पाण्यामुळे गावातील लहान मुले व ग्रामस्थांमध्ये आजारांचे प्रमाण कमी झाल्याचे समाधान व्यक्त करण्यात येत आहे. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला 'कुसुमाग्रज वाचन अभियान' अंतर्गत सुमारे ३५० पुस्तकांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी शिवाजी कोलते पाटील व संजय वाल्हेकर यांनी मार्गदर्शन केले. सरपंच मनीषा कोलते, उपसरपंच सुनील कोलते, ग्रामविकास अधिकारी थिटे व ग्रामपंचायत सदस्यांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहापूर ग्रामपंचायतीच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



# म.फु.कृषी विद्यापीठाच्या फळपिके प्रकल्पाला 'उत्कृष्ट केंद्र' पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत उद्यानविद्या विभागातील अखिल भारतीय समन्वित फळपिके संशोधन प्रकल्पास द्वितीय क्रमांकाचा 'उत्कृष्ट केंद्र' पुरस्कार प्राप्त झाला आहे. गोविंद बल्लभ कृषि व तंत्रज्ञान विद्यापीठ येथे आयोजित १३ व्या वार्षिक गटचर्चा बैठकीत हा सन्मान प्रदान करण्यात आला. भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील सहाय्यक महासंचालक (बागायती फळे व मसाला पिके) डॉ. व्ही.बी. पटेल यांच्या हस्ते प्रकल्पाचे प्रभारी अधिकारी डॉ. सुमती दिघे व सहकाऱ्यांनी पुरस्कार स्वीकारला. बैठकीस देशभरातील सुमारे ३०० शास्त्रज्ञ उपस्थित होते. कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके व विभागप्रमुख डॉ. बी.टी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्पाने फळपिकांबाबत ७० हून अधिक शिफारशी प्रसारित केल्या आहेत. लिंबूवर्गीय पिकांचे 'साई सरबती' व 'फुले सरबती' तसेच मोसंबीचे 'फुले मोसंबी' व 'फुले रसिका' हे सुधारित वाण विकसित करण्यात आले. 'फुले मोसंबी'ची उत्पादन क्षमता २०.१२ टन प्रति हेक्टर असून तो रोग-किडीस सहनशील आहे, तर 'फुले रसिका' वाणात उच्च जीवनसत्व 'क' प्रमाण आढळते. या वाणांमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेत कोट्यवधी रुपयांची भर पडल्याचे नमूद करण्यात आले. उत्कृष्ट संशोधन, शिफारशी व शेतकरीहिताच्या कार्यामुळे या प्रकल्पास हा बहुमान मिळाला. विद्यापीठ प्रशासनाने सर्व शास्त्रज्ञ व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

# नागरिकांनो डोंगरांना आग लावू नका ; वनसंपदा जपा : दुर्गाताई तांबे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : उन्हाळा सुरू झाला की अनेक ठिकाणी डोंगरांना आगी लावल्या जातात. यामुळे विविध वृक्षांसह नैसर्गिक वनसंपदेची मोठी हानी होत असते. वृक्ष संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी असून कोणीही डोंगरांना आगी लावू नका उलट चुकून वनवा लागल्यास तात्काळ वन विभाग व ग्रामपंचायत कार्यालयास कळवा. आपल्या वनसंपदेची काळजी घ्या असे आवाहन दंडकारण्य अभियानाच्या प्रकल्प प्रमुख दुर्गाताई तांबे यांनी केले आहे. संगमनेर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये विविध डोंगरांवर आगी लागण्याचे प्रमाण वाढले असून ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

वनसंपदेच्या रक्षणाबाबत आवाहन करताना दंडकारण्य अभियानाच्या प्रकल्प प्रमुख दुर्गाताई तांबे यांनी म्हटले आहे की, पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची मूलभूत जबाबदारी आहे. प्रत्येक माणसाच्या जीवनात ऑक्सिजन आणि वनराईचे अत्यंत महत्त्व आहे. कोरोना काळामध्ये ऑक्सिजनची कमतरता जगाने अनुभवली आहे. हा कटू काळ अत्यंत धोकादायक होता त्यावर प्रभावी मात करण्याकरता वृक्षारोपण संवर्धन हे अत्यंत गरजेचे आहे ही संस्कृती आपण वाढवली पाहिजे. मात्र अनेक ठिकाणी डोंगरांना आगी लावण्याचा प्रकार होत आहे. निष्काळजीपणे शेकोटी पेटवणे. डोंगरांमध्ये कचरा पेटवणे यातून डोंगरांना आग लागण्याच्या घटना वारंवार घडत आहेत. संगमनेर तालुक्यातील पठार भागामध्ये अनेक डोंगरांना आग लागली असून यामुळे वृक्षांची मोठी हानी झाली आहे. त्यामधून पर्यावरण धोक्यात येत आहे. लहान लहान झाडे नष्ट होत आहेत. मोठी झाडे होरपळून जात आहे. वन्य जीव नष्ट होत आहेत. निसर्गचक्र थांबत आहे. असे होणे दुर्दैवी आहे. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून भावी पिढीच्या रक्षणाकरता दंडकारण्य अभियान सुरू झाले.



लोकनेते बाळासाहेब थोरात व मा.आ.डॉ.सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील सर्वसामान्य जनतेने या अभियानात सहभाग घेऊन ही मोठी लोक चळवळ केली. हे अभियान संगमनेर तालुक्याची ओळख बनली. आजही विविध डोंगरांवर वृक्ष जगवण्यासाठी दंडकारण्य अभियान समितीच्या माध्यमातून सातत्याने काम सुरू आहे.

उन्हाळ्यामध्ये टँकरद्वारे पाणी टाकून अनेक वृक्ष जगवली जात आहेत. मात्र काही ठिकाणी बेपरवाहीने डोंगरांना लागलेल्या आगी मुळे वनसंपदेचे मोठे नुकसान होत असून नागरिकांनी हिरवाई वाचवण्यासाठी सतर्क रहावे. तसेच डोंगरांना आग लागल्यास तातडीने वन विभागाशी संपर्क साधावा. तालुका जिल्हा स्तरावरील वन विभागाने अत्यंत जागरूक राहून गस्त वाढवण्याबरोबर संशयतांवर कठोर कारवाई करावी. आपले डोंगर आपले पर्यावरण या अभियानात सर्व ग्रामस्थ व नागरिकांनी सुद्धा सहभाग घ्यावा असे आवाहन माजी नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे यांनी केले आहे.

## पान १ वरुन

## डॉ. सुजय विखे यांची भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड

उत्साहाचे वातावरण आहे. स्वतः डॉ. विखे यांनीही या जबाबदारीला संधी मानत राज्यभर पक्षवाढीसाठी अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. २०२९ च्या निवडणुकांवर लक्ष भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने या नव्या कार्यकारिणीला मान्यता देताना २०२९ मधील लोकसभा आणि विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. संघटनात्मक बळकटी, नव्या नेतृत्वाला वाव आणि विविध सामाजिक घटकांपर्यंत पोहोच वाढवणे या उद्दिष्टांवर भर देण्यात आला आहे. नव्या चेहऱ्यांना दिलेली संधी ही आगामी राजकीय रणनीतीचा भाग मानली जात आहे.

प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झालेली प्रमुख नावे डॉ. सुजय विखे यांच्यासह खालील नेत्यांना प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे: गोपीचंद पडळकर, चेतन देशमुख, अतुल कासेकर, भारती पवार, संजय कोडगे, संजय भेंडे, रामदास तडस, केशव उपाध्याय, प्रवीण पोटे आणि अर्चना चाकोरकर तसेच सरचिटणीस पदावर निरंजन डावखरे, योगेश क्षिरसागर, संजय कुटे, माधवी नाईक, राजेश पांडे आणि सुनील राणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चिटणीस म्हणून प्रशांत ठाकूर, मंगेश चव्हाण, वर्षा ढहाळे, संजय जगताप, रोहिणी नायडू, राम सातपुते, प्रवीण घुगे, रेखा कुलकर्णी आणि भैरवी वाघ यांची निवड झाली आहे. कोषाध्यक्षपदी मिहिर कोटेचा, सहकोषाध्यक्ष म्हणून लखानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुख्य प्रवक्तेपदी नवनाथ बन, युवा मोर्चा अध्यक्षपदी कृष्णराज महाडिक तर महिला मोर्चा अध्यक्षा म्हणून चित्रा वाघ यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

## घोडनदी प्रदूषण; नागवडे कारखान्याला २.३२ कोटींचा दंड

झाली व त्यानंतर सामाजिक वातावरण बिघडले. आपल्याच जातीच्या दुकानातून किराणा घ्या, इथपासून किर्तनकारही आपल्याच जातीचा बोलवावा इथपर्यंत हे लोण गेले, अशा परिस्थितीत काँग्रेस पक्षाने पुढाकार घेऊन सद्भावना पदयात्रा काढत समाजातील सर्व जाती धर्माच्या लोकांना बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न केला.

## पार्थ पवार राज्यसभेवर

आघाडीला एक जागा मिळणार आहे. मात्र महाविकास आघाडीकडून कुणाला संधी मिळणार याबाबत सध्या अनेक दावे करण्यात येत आहे.मशरद पवार, रामदास आठवले, फौजिया खान, रजनी पाटील, प्रियांका चतुर्वेदी, धैर्यशील पाटील आणि भागवत कराड यांचा राज्यसभेत कार्यकाळ संपल्याने राज्यसभेच्या ७ जागांवर निवडणूक आयोगाने निवडणुकीची घोषणा केली आहे.

## आ. ओगले यांनी ड्रग्स प्रकरण विधानसभेत गाजवले!

पोलिसाने जवळपास अडीच कोटींचे ड्रग्स पुणे येथे विकले असल्याची धक्कादायक माहिती आली. याप्रकरणाच्या मागे व पुढे कोण आहे हेही शोधणे गरजेचे आहे. याबाबत प्रशासनाने कोणतीही ठोस अशी कारवाई केली नाही. श्रीरामपूरमध्ये कुरियरद्वारे नशेचे इंजेक्शन्स व नशेच्या गोळ्या आणून त्या विकणाऱ्याचे रॅकेटही पोलिसांनी शोधून काढले होते मात्र त्यावरही काहीच कार्यवाही झाली होऊ शकली नाही. अशा प्रकारच्या मोठ्या प्रमाणावर ड्रग्स आणि नशेचे इंजेक्शन गोळ्या विकणाऱ्या टोळीच्या मागे अजून कोणी आहे का नाही याबाबतही तपास थंडावला आहे. १४ कोटीचे ड्रस प्रकरणात बेंगलोर कर्नाटक सातारा, कराड, सांगली येथील काही लोकांचा सहभाग असल्याचे तपासात दिसून आले होते मात्र त्याबाबत काहीच कारवाई झाली नाही. याबाबतच्या तपासाबाबत मुख्यमंत्री यांनी खुलासा करावा अशी मागणी आमदार हेमंत ओगले यांनी केली.

## मुख्यमंत्र्यांकडून १२ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या

विभाग: २३.६४ कोटी रुपये, महसूल आणि वन विभाग: १३२ कोटी रुपये, वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग: ३१ कोटी रुपये, अशा पुरवणी मागण्या करण्यात आल्या.

दरम्यान, अर्थसंकल्प या शब्दातून महायुती सरकारच्या काळात प्रत्येक अधिवेशनात जर पुरवणी मागण्या त्याही हजारो कोटींच्या येत असतील तर नियोजन ते काय? आणि अर्थसंकल्पीय अधिवेशनात ही त्या आणल्या जात असतील तर या संकल्पाला अर्थ काय? हा प्रश्न विचारला पाहिजे, असं सचिन सावंत यांनी म्हटलं. सचिवांच्या आदेशानंतरही रद्द शाळांच्या पुनर्मूल्यांकनाचे आदेश करण्यात आलेल्या शाळांना पुन्हा मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. या निर्णयामागे राजकीय वरदहस्त असल्याचीही चर्चा रंगू लागली आहे. सचिवांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत घेतलेल्या या भूमिकेमुळे बहुजन कल्याण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दरम्यान, शासनाकडून याबाबत अधिकृत भूमिका स्पष्ट करण्यात येणार का, याकडे लक्ष लागले आहे.

# करंजी येथिल कल्पेश भिंगारे यांचे पुण्यस्मरण समाजाला आदर्श उपक्रमातून



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** तालुक्यातील करंजी येथील श्री. अरुण भास्कर भिंगारे यांच्या चिरंजीव स्व. कल्पेश अरुण भिंगारे यांचे प्रथम पुण्यस्मरण दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सामाजिक बांधिलकी जपत अनोख्या पद्धतीने साजरे करण्यात आले. या निमित्ताने एकलव्य आदिवासी आश्रम शाळा टाकळी येथे विद्यार्थ्यांना भोजनदान तसेच प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ब्लँकेटचे वाटप करून स्मृतिदिन अर्थपूर्ण करण्यात आला. स्व. कल्पेश भिंगारे यांचे सुमारे साडेपाच महिन्यांपूर्वी आकस्मिक निधन झाले होते. पंचक्रोशीतील गावांमध्ये मित्रपरिवारात मनमिळावू, होतकरू आणि मदतीस तत्पर असा त्यांचा स्वभाव सर्वपरिचित होता. एकुलत्या एक मुलाच्या निधनाने भिंगारे कुटुंबावर मोठा आघात झाला असला, तरी त्याची स्वप्ने आणि मूल्ये जपण्याचा निर्धार करत कुटुंबीय व मित्रपरिवाराने या दुःखातून सकारात्मक वाट निवडत पुण्यस्मरणाचा हा सामाजिक उपक्रम राबविला. या कार्यक्रमाला संजीवनी शैक्षणिक संस्थेचे विश्वस्त सुमित नितीनराव कोल्हे, संजीवनी स्वयंसहायता बचत गटाच्या अध्यक्षा , करंजी व टाकळी येथील ग्रामस्थ, टाकळी ग्रामपंचायतचे सरपंच संदीपजी देवकर, करंजीचे सरपंच रवीभाऊ आगवन तसेच भिंगारे परिवारातील स्नेही, आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शाळेच्या वतीने कल्पेश यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी सुमित कोल्हे यांनीही भिंगारे परिवाराच्या सुखदुःखात कोल्हे परिवार सदैव सहभागी असल्याचे सांगत, गरजू आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये स्वतःच्या मुलाचा आनंद शोधण्याचा परिवाराचा विचार प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. एकूणच, सामाजिक संवेदना, सेवाभाव आणि स्मृतींचा सन्मान यांचे सुंदर संगम ठरलेला हा उपक्रम उपस्थितांच्या मनात भावनिक ठसा उमटवून गेला. स्व. कल्पेश भिंगारे यांच्या स्मृती जपताना समाजोपयोगी कार्यातून प्रेरणा देणारे हे पुण्यस्मरण परिसरासाठी आदर्श ठरले.

## निधन वार्ता

### सुभाष जुंबड



**शेवगाव :** राक्षी ता.शेवगाव येथील प्रगतिशील शेतकरी सुभाष गणपत जुंबड (वय ७४) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, दोन मुले एक मुलगी सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते धार्मिक प्रवृत्तीच्या होते त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पत्रकार दादासाहेब डोंगरे यांचे ते सासरे, तर केंद्रीय राखीव पोलीस दलातील भरत व नामदेव यांचे ते वडील होते.

### अनिल विखे



**कोल्हार :** लोणी बुद्रुक ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच व पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य अनिल एकनाथ विखे (वय ५९) यांचे नुकतेच हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, दोन भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. लोणी येथील सुनील एकनाथ विखे व संजय एकनाथ विखे यांचे ते बंधू होत तर कोल्हार येथील ॲड. शंकरराव उर्फ बाबासाहेब खळदकर यांचे ते भाचे होत.

## डॉ. सुजय विखे यांच्या निवडीचा राहात्यात जल्लोष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात ज्यांनी आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवला असे मा. खा. डॉ. सुजय विखे यांची महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीवर उपाध्यक्षपदी निवड होताच राहाता नगरपालिका व राहाता शहरवासीयांच्या वतीने आनंदोत्सव साजरा करत एकमेकांना पेढे भरवत जल्लोष साजरा करण्यात आला आहे. डॉ .सुजय विखे यांनी भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यात मोठे संघटन उभे केले असून भारतीय जनता पार्टीची ताकद मोठ्या प्रमाणात वाढवली आहे अहिल्यानगर महानगरपालिकेसह शिर्डी, राहाता नगरपरिषदे वर एकतर्फी सत्ता हस्तगत करत भाजपचा झेंडा रोवला आहे .त्याचबरोबर राज्याच्या सत्तेत असलेले शिवसेना शिंदे गट राष्ट्रवादी अजित दादा पवार गट यांना बरोबर घेऊन सत्तेच्या चाव्या भाजपच्या हातात घेतले आहेत . त्यांचे कडे असलेले संघटन कौशल्याच्या जोरावर त्यांनी हे वाटचाल केली आहे याची दखल घेत महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टीने त्यांना प्रदेश उपाध्यक्ष या पदावर काम करण्याची संधी मिळवून दिली आहे . २०१९ मध्ये होणाऱ्या निवडणुकांची ही पूर्वतयारी असून डॉ . विखे यांना दिलेली जबाबदारी ते निश्चितपणे पार पडतील असा आत्मविश्वास व्यक्त करत राहाता नगरपालिका व शहरवासी यांच्या वतीने काल मोठा जल्लोष साजरा करण्यात आला याप्रसंगी नगराध्यक्ष डॉ . स्वाधीन गाडेकर, उपनगराध्यक्ष विजय सदाफळ गणेश कारखान्याचे माजी चेअरमन मुकुंदराव सदाफळ,माजी नगराध्यक्ष कैलास सदाफळ, गटनेते मुन्ना शहा, भाजपा शहराध्यक्ष शोभा घोरपडे, मोहनराव सदाफळ, दशरथ तुपे, राहुल सदाफळ ,अजय आग्रे, प्रवीण बोरकर, भीमराज निकाळे, अक्षय बोठे, नगरसेवक नगरसेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दादांच्या कष्टाची पावती : नगराध्यक्ष डॉ . गाडेकरशिर्डी मतदारसंघासह अहिल्या नगर जिल्ह्यात डॉक्टर सुजय दादा विखे यांच्या संघटन कौशल्य व कष्टाची पावती म्हणून भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यकारिणीने त्यांना उपाध्यक्षपदाची जबाबदारी दिली ही आमच्यासाठी अभिमानास्पद बाब आहे.



## सात्रळ महाविद्यालयात स्वसंरक्षण व समुपदेशन कार्यशाळा उत्साहात




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील (पद्मभूषण) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'निर्भय कन्या अभियान' अंतर्गत विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण व समुपदेशन कार्यशाळा उत्साहात पार पडली. ही कार्यशाळा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळाच्या संयुक्त विद्यमाने महिला सबलीकरण कक्षांतर्गत आयोजित करण्यात आली.

कार्यशाळेसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षक प्रतीक्षा देवरे (ब्लॅक बेल्ट, नॅशनल सिल्व्हर मेडलिस्ट) यांनी मुलींना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. आरोग्य समुपदेशक डॉ. अनिता गागरे (सोनगाव) यांनी आरोग्या संदर्भात घ्यावयाची काळजी व पोषक आहाराविषयी मार्गदर्शन केले. सामाजिक उपदेशक सौ. गायत्री म्हस्के (प्रवरानगर) यांनी 'बोलते व्हा' या विषयावर संवाद साधत आत्मविश्वास व वेळेचे नियोजन याबाबत मार्गदर्शन केले.

प्रभारी प्राचार्य डॉ. सोपान शिंगोटे अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य डॉ. जयश्री सिनगर, डॉ. रोहिदास भडकवाड, प्रो. डॉ. रामदास बोरसे, डॉ. भाऊसाहेब नवले, प्रा. दिनकर घाणे, ॲड. अनिल गागरे तसेच प्रा. डॉ. छाया कार्ले, डॉ. प्रतिभा विखे, डॉ. सुषमा उंडे, प्रा. प्रियंका गागरे, प्रा. प्रियंका तांबे, प्रा. शरयू दिघे, प्रा. स्वाती कडू, प्रा. अश्विनी साळुंखे व प्रा. प्रतिभा वर्पे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. दीप्ती आगरकर यांनी केले, तर आभार प्रा. सोनाली मुन्तोडे यांनी मानले.

## वंध्यत्व जनजागृतीसाठी ओएसिस जननी यात्रा नाशिकमध्ये विविध समुदायांना मार्गदर्शन करणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** पुनरुत्पादन औषधशास्त्र क्षेत्रातील देशातील विश्वसनीय कंपनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ओएसिस फर्टिलिटीने आपल्या ओएसिस जननी यात्रा या देशव्यापी जनजागृती मोहिमेचा पुढचा टप्पा जाहीर केला. यंदाची ओएसिस जननी यात्र नाशिक येथे आयोजित करण्यात आली आहे. टायर २ आणि ३ शहरांतील लोकांमध्ये वंध्यत्वाविषयी जागरुकता निर्माण करणे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे, वंध्यत्वाच्या प्राथमिक तपासणीची सुविधा पोहोचवणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. या मोहिमेद्वारे समाजातील विविध स्तरांतील लोकांमधील संभ्रम दूर करुन त्यांना पालकत्वाच्या दिशेने योग्य पाऊल उचलण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

नाशिक येथे पार पडलेल्या या भव्य कार्यक्रमाप्रसंगी ास शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी इतर मान्यवरांनीही हजेरी लावून कार्यक्रमाचे महत्त्व विशद केले. ओएसिस फर्टिलिटीच्यावतीने लोकांना पुनरुत्पादन आरोग्याशी संबंधित मिळणारे मूलभूत शिक्षण, पुनरुत्पादन आरोग्याच्या प्रचारासाठी लोकांपर्यंत पोहोचण्याची तळमळ याविषयी उपस्थित पाहुण्यांनी या



उपक्रमाचे कौतुक केले. कंपनीने सामुदायिक स्तरावर आरोग्यविषयक जोरदार प्रचार केल्याने सर्वांनी या उपक्रमाची प्रशंसा केली. वंध्यत्वासारख्या विषयावर समाजात सार्वजनिक पातळीवर चर्चा घडवून आणल्याबद्दल कंपनीचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे मान्यवरांनी सांगितले. बदलती जीवनशैली, दिरंगाईने होणारे लग्न, वैज्ञानिक माहितीचा अभाव यांमुळे वंध्यत्वाच्या समस्यांमध्ये सातत्याने वाढ दिसून येत आहे. ही समस्या लक्षात घेत ओएसिस जननी यात्रा बसच्या माध्यमातून जोडप्यांना तज्ज्ञांकडून मोफत सल्ला दिला जातो. विविध चाचण्यांची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते.

यात नमुना संकलन केंद्रांद्वारे (कलेक्शन झोन्स) मोफत एएमएच, वीर्य विश्लेषण आणि हिमोग्लोबिन तपासणीचा समावेश आहे. या केंद्रात जोडप्यांना वेळेवर अचूक आणि संवेदनशील मार्गदर्शन दिले जाते. नाशिक येथील यशस्वी यात्रेनंतर आता लासलगाव, मालेगाव आणि राज्यातील इतर भागांत यात्रेचा पुढील प्रवास सुरु राहील. अधिकाधिक लोकांपर्यंत वंध्यत्वाविषयी जागरुकता आणि प्राथमिक तपासणीची सुविधा पोहोचवण्यासाठी ह यात्रा प्रयत्नशील राहील. या प्रसंगी बोलताना नाशिक महानगरपालिकेच्या महापौर हिमगौरी आहेर-आडके यांनी ओएसिस जननी यात्रेमुळे समाजातील वंधत्वाच्या समस्येबद्दल माहिती देत या आर्थिकदृष्ट्या सक्षम नसलेल्या सामान्य लोकांना या आरोग्य सेवा मिळताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ओएसिस फर्टिलिटीने सुरु केलेल्या या पथदर्शी उपक्रमातून सर्व स्तरांतील सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीच्या लोकांना ही सेवा मिळायाला हवी. पुण्यात ही मोहिम यशस्वी ठरली. आता नाशिक येथेही या मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळेल. या मोहिमेतून सकारात्मक बदल घडतील. आम्ही या बदलांच्या प्रतीक्षेत आहोत.' ओएसिस फर्टिलिटीच्या वंध्यत्व निवारण तज्ज्ञ सल्लागार डॉ. पल्लवी उंटवाल म्हणाल्या, 'ओएसिस जननी यात्रेला मिळत असलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, जोडप्यांना वंध्यत्वाच्या समस्येवर मात करण्याची आवश्यक असलेल्या मार्गदर्शनाची गरज लक्षात येते.

## श्री नर्मदेश्वर शिवलिंग प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास प्रारंभ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील श्रीक्षेत्र ब्राम्हणी येथील पुरातन महादेव मंदिरात श्री नर्मदेश्वर शिवलिंग प्राणप्रतिष्ठा व मंदिर जीर्णोद्धार सोहळ्यास मंगळवार, दि. २४ फेब्रुवारीपासून उत्साहात प्रारंभ झाला. आकर्षक फुलांची सजावट व विद्युत रोषणाईमुळे संपूर्ण गाव शिवमय झाले आहे.

पहिल्या दिवशी सकाळी गंगाजल पूजन व भव्य मिरवणूक काढण्यात आली. बसस्थानकापासून महादेव मंदिरापर्यंत ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक पार पडली. शिवभक्तांचे पुष्पवृष्टीने स्वागत करण्यात आले. श्रीराम व हनुमान मंदिरात दर्शन घेऊन महादेव मंदिरात शिवलिंगावर गंगाजल अभिषेक करण्यात आला.

सकाळी ११ वाजता विजूगुरू जोशी व राजगुरू जोशी यांच्या मंत्रोच्चारात २१ जोडप्यांच्या उपस्थितीत विधीवत पूजेला सुरुवात झाली. नव्या नर्मदेश्वर शिवलिंगावर गंगाजल व दुग्धाभिषेक करून होम प्रज्वलित करण्यात आला. सायंकाळी शिवलिंगाची भव्य मिरवणूक काढण्यात आली.

दि. २५ रोजी विविध पूजा, तर दि. २६ रोजी हभप सुनीलगिरी महाराज यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. दि. २७ रोजी एकादशीनिमित्त ॲड. शंकर महाराज शेवाळे यांचे हरी कीर्तन व फराळ प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. चार दिवसीय सोहळ्यात ग्रामस्थांनी सहभागी व्हावे, तसेच मांस व दारू विक्रेत्यांनी दुकाने बंद ठेवून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सोयाबीन पिकाची नासाडी, ॲट्रोसिटी दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** शेतात काढणीस आलेली सोयाबीन पिक सोंगण्यासाठी दिले असता ते ऐन पावसात सोंगून नासाडीस कारणीभूत ठरल्या प्रकरणी कोपरगाव तालुक्यातील खोपडी येथे अनुसुचित जाती जमाती कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी संजय पप्पा त्रिभूवन यांनी सदर गुन्हा कोपरगाव पोलीस ठाण्यात नोंदवा असून फिर्यादीत म्हटले आहे की,दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी माझ्या शेतातील सोयाबिन काढणीसाठी आली असता ते पिक मी आदिनाथ ज्ञानदेव वारकर यास सोंगणी व काढणी सांगून कामा निमित बाहेरगावी गेलो असता. त्या दिवशी ढगाळ वातावरण असल्याने पत्नी अलका हिने आदिनाथला यास सोयाबिन काढु नको अशी विनंती केली. परंतु त्याने तिचे न ऐकता सोयाबिन काढले व त्यामुळे आमच्या सोयाबिनचे नुकसान झाले होते. या कारणावरून २८ सप्टेंबर रोजी आदिनाथ व माझ्यात वाद झाले असता आदिनाथने माझे विरोधात त्याच्या भावबंदाना फूस माझे विरूद्ध भडकवले . दि. ८ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजण्याच्या च्या सुमारास माझ्या घरी आदिनाथ ज्ञानदेव वारकर, जालिंदर चांगदेव वारकर, ओम जालिंदर वारकर, साखरबापु मगन वारकर, नवनाथ मगन वारकर, गोरख चांगदेव वारकर, बाळासाहेब छबु वारकर, सर्व रा. खोपडी, असे एकत्र जमुन माझ्या घरासमोर आले. मला शिवीगाळ करुन सर्वांनी मला तसेच माझी पत्नी अल्का, मुलगी सिमा व प्रेरणा अशांना देखील हाताबुक्यांनी मारहाण केली होती. यासंदर्भात माझी पत्नी अल्का हिने कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवली असता दि. ३० सप्टेंबर रोजी दुपारी१ च्या सुमारास मी गावातील म्हसोबा मंदिराकडुन जात असतांना आदिनाथ ज्ञानदेव जालिंदर ओम साखरबापु , नवनाथ , गोरख , बाळासाहेब वारकर यांनी मला थांबवुन मला धमकी देत तुझ्या पत्नीने आमच्या विरुद्ध दिलेली फिर्याद मागे घे नाहितर तुला गावात राहू देणार नाही असे मला जातिवाचक शिवीगाळ केली . यावरून संजय त्रिभूवन यांनी वरील इसमाविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास शिर्डी उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल भारती हे करत आहे .

# दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जयंतीकडे दुर्लक्ष; शिस्तभंग कारवाईची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** मराठी पत्रकारितेचे जनक म्हणून ओळखले जाणारे बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीकडे गंगापूर येथील विविध शासकीय कार्यालयांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणी भारतीय बहुउद्देशीय पत्रकार संघ यांनी मुख्यमंत्री कार्यालयाकडे लेखी तक्रार अर्जाद्वारे केली आहे.

२० फेब्रुवारी रोजी बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती शासन आदेशानुसार सर्व शासकीय कार्यालयांत साजरी करणे बंधनकारक असताना, तहसील कार्यालय, कृषी कार्यालय, भूमी अभिलेख, दुय्यम निबंधक, जायकवाडी प्रकल्प, नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, गटशिक्षण अधिकारी कार्यालय, वीज वितरण, पशुवैद्यकीय कार्यालय तसेच बस आगार येथे जयंती साजरी करण्यात आली नसल्याचे तक्रारीत नमूद आहे.

ही बाब महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ व शासन परिपत्रकांचे उल्लंघन असल्याचा दावा करण्यात आला आहे. दोषींवर कारवाई करून पुढील वर्षी जयंती नियमितपणे साजरी करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे. तक्रारीची प्रत संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आली आहे.

## नशिबाची परिक्षा

बुधवार दि . २५ फेब्रुवारी २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२५ २६० ४४० | ८-१ | १३७ ३८० ३३५ | जोड ८०-४१-२५-९७-१६ |

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १३६ ३७० ३३४ | ०-२ | १५६ २४६ ६६० | जोड ०६-४२-१८-३५-२९ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| ३९० ४८० २२८ | २-८ | १७० ३५० ८०० | जोड २१-३८-६४-७९-८० |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |

✻ वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये ✻

# योग्य नियोजनामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात टळली पाणीटंचाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भंडारदरा, निळवंडे, मुळा व कुकडी प्रकल्पांतील पाण्याचे सुयोग्य नियोजन झाल्याने यंदा अहिल्यानगर जिल्ह्यावर पाणीटंचाईची तीव्रता ओढावली नाही. उन्हाची तीव्रता वाढत असतानाही टंचाईग्रस्त गावांना आवर्तनांद्वारे दिलासा मिळाल्याने प्रशासनावरील ताण लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. अहिल्यानगर जिल्ह्याने पूर्वी अनेकदा अपुऱ्या पावसामुळे व विस्कळीत नियोजनामुळे पाण्यासाठी संघर्ष अनुभवला आहे.

समन्यायी पाणी वाटप कायद्यामुळे धरणांमधून जायकवाडी धरण येथे पाणी सोडण्याच्या प्रश्नावरून राजकीय व सामाजिक तणावही निर्माण झाला होता. मात्र यंदा सरासरी पावसामुळे भंडारदरा धरण, निळवंडे धरण आणि मुळा धरण येथे समाधानकारक पाणीसाठा उपलब्ध झाला. त्याचा लाभ शेती व पिण्याच्या



पाण्याच्या योजनांना झाला. जलसंपदा विभागाने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार रब्बी हंगामासाठी आवर्तने वेळेत सुरू केली. निळवंडे कालव्यातून शेवटच्या गावापर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले.

ओढे-नाल्यांमार्फत गावांच्या तलावांत पाणी साठविण्याची व्यवस्था करण्यात आल्याने उत्तर अहिल्यानगरमधील दुष्काळी गावांना मोठा दिलासा मिळाला आहे. मागील अनेक दशकांत प्रथमच अशा प्रकारे नियोजनबद्ध पाणीपुरवठा झाल्याची भावना व्यक्त होत आहे. कुकडी धरण समूहात सध्या २७.८९ टीएमसी उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध असून डाव्या कालव्यातून रब्बी आवर्तन सोडण्यात आले आहे. उन्हाळी आवर्तनाचेही नियोजन प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच मुळा, आढळा, मांडओहोळ व घाटशिळ पारगाव प्रकल्पांतूनही टप्प्याटप्प्याने आवर्तने सुरू करण्यात आली आहेत. प्रशासनाने संभाव्य टंचाई लक्षात घेऊन तालुकानिहाय पूर्वतयारी ठेवली असली तरी धरणांतील उपलब्ध साठा आणि योग्य नियोजनामुळे सध्या पिण्याच्या पाण्याची मागणी नगण्य आहे. अनेक ठिकाणी टँकरची आवश्यकता कमी झाल्याने शासनाचा आर्थिक भारही कमी झाला आहे. सन २०२५-२६ मध्ये जून ते ऑक्टोबरदरम्यान भंडारदरा परिसरात सुमारे ५५० मिमी पाऊस नोंदविला गेला.

१५ ऑक्टोबर २०२५ रोजी भंडारदरा येथे १०७३९ दलघफु तर निळवंडे येथे ८०६४ दलघफु पाणीसाठा उपलब्ध होता. मुळा प्रकल्पात २१५०० दलघफु, आढळा येथे १०६० दलघफु, मांडओहोळ येथे ३१० दलघफु तर घाटशिळ पारगाव येथे २९७ दलघफु साठा नोंदविण्यात आला. सद्यस्थितीत विविध प्रकल्पांतून सिंचन व बिगरसिंचनासाठी नियोजित आवर्तने सुरू आहेत. निसर्गाची साथ आणि अचूक नियोजन यामुळे यंदा जिल्ह्याची तहान भागली असून धरणांमध्ये अद्यापही समाधानकारक पाणीसाठा शिल्लक आहे.

## द•ख•ल

### शिवजयंती निमित्त खरडगावात विविध उपक्रम



**शेवगाव** : खरडगाव ता. शेवगाव येथे शिवजयंती निमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले.याप्रसंगी ह.भ.प. विष्णू महाराज अंत्तरकर यांच्या सुमधुर वाणीतून कीर्तन सेवा संपन्न झाली. यावेळी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित होती. कीर्तन सेवेत बोलताना महाराज म्हणाले, जोपर्यंत घरामध्ये मुलांचा बाप असतो, तोपर्यंत त्या घरावर कुणाची वाईट नजर पडत नाही. धर्माचे पालन करण्यासाठी भगवंताला या पृथ्वीतलावर पुन्हा पुन्हा अवतार घ्यावा लागतो. धर्माचा स्वाभिमान प्रत्येकाने जपला पाहिजे. त्यांनी प्रत्येक घरात भगवद्गीता वाचन व्हावे, गीतेशी आपले नाते जोडावे, असा संदेश देत गीता से क्या नाता है, गीता हमारी माता है, अशी भावनिक हाक दिली. कार्यक्रमात शिवविचार अंगीकारून चांगल्या कार्याला प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त करण्यात आली. कीर्तन सोहळ्यामुळे गावात भक्तीमय आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

### वडझिरे येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरीनाम सप्ताह

**पारनेर** : पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील अखंड हरीनाम साप्ताहास ५० वर्ष पूर्ण झाल्यामुळे, सुवर्ण महोत्सवी अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार दि.२४ फेब्रुवारी ते शुक्रवार दि.६ मार्च २०२६ या कालावधीमध्ये ११ दिवशीय भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आले आहें.हभप ज्ञानेश्वर महाराज कदम छोटे माऊली यांच्या मार्गदर्शनाखाली या साप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर सप्ताह काळामध्ये राज्यातील मातब्बर किर्तनकारांची कीर्तनसेवा होणार आहें. तरी सर्व भाविका भक्तांनी या साप्ताहातील कीर्तनांच्या श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ वडझिरे यांनी केलें आहे.

### अरणगाव दुमाला येथे संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान



**लिंपणगाव** : श्रीगोंदे तालुक्यातील अरणगाव दुमाला येथे संत गाडगे बाबा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. ग्रामस्थांनी संतांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व त्यांच्या समाजप्रबोधनाच्या कार्याची आठवण केली. यावेळी सरपंच मोहनराव आढाव यांनी गाडगेबाबांच्या विचारांचा गौरव करताना त्यांच्या कीर्तनातून दिलेल्या सामाजिक संदेशांचा उल्लेख केला. चोरी करू नका, व्यसनांपासून दूर राहा, सावकाराकडून कर्ज घेऊ नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका, असा थेट आणि परिणामकारक संदेश त्यांनी समाजाला दिला. देव दगडात नसून माणसांत आहे, हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले. जयंतीनिमित्त ग्रामस्थ व युवकांनी गावात स्वच्छता अभियान राबवून संतांना प्रत्यक्ष कृतीतून अभिवादन केले. स्वच्छता हीच खरी सेवा हा संदेश देत रस्ते व सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली तसेच घनकचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करण्यात आली. ग्रामीण भाग स्वच्छ व हागणदारीमुक्त करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे महत्त्वही अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमास ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी रखडली

**अहिल्यानगर** : नेप्ती उपबाजार समिती परिसरातील बोर्ड व कोनशिला हटविण्याबाबत मुंबई उच्च न्यायालय (औरंगाबाद खंडपीठ) यांनी दिलेल्या आदेशाची मुदत संपूनही अंमलबजावणी न झाल्याने तक्रारदार अमोल येवले यांनी पणन संचालक व जिल्हा उपनिबंधक यांना स्मरणपत्र पाठविले आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर अंतर्गत नेप्ती उपबाजार समितीतील संबंधित फलक व कोनशिला हटविण्याचे स्पष्ट आदेश न्यायालयाने ७ जानेवारी २०२६ रोजी दिले होते. सहा आठवड्यांच्या आत कार्यवाही करण्याची मुदत २१ फेब्रुवारी २०२६ रोजी संपली. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप येवले यांनी केला आहे.न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होत असल्याची भावना व्यक्त करत त्यांनी तात्काळ कार्यवाहीची मागणी केली आहे. अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कोर्ट अवमान याचिका दाखल करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

## पेरणाताई देशमुख यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त ज्ञानेश्वरी प्रवचन




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अमरापूर** : कै. ग.भा. पेरणाताई उर्फ सरस्वतीबाई माणिकराव देशमुख यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त कुकाणा येथे भक्तिमय वातावरणात ज्ञानेश्वरीवरील अध्याय २२ व २३ यांवर प्रवचन सोहळा आयोजित करण्यात आला. ह.भ.प. सखाराम महाराज कर्डीले यांच्या भावपूर्ण निरूपणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. महाराजांनी ज्ञानेश्वरी मधील तत्त्वज्ञान अत्यंत सोप्या व प्रभावी भाषेत उलगडून सांगितले. भक्ती, श्रद्धा आणि नामस्मरण यांचे जीवनातील महत्त्व अनन्यसाधारण आहे. मन, वाणी व कर्म यांमध्ये शुद्धता राखून ईश्वरनिष्ठ जीवन जगणे हाच खरा धर्म आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. आत्मज्ञान, समत्वभाव व सदाचार यांच्या आधारे जीवन समृद्ध करण्याचा संदेश देत त्यांनी अध्यात्माचे महत्त्व अधोरेखित केले. या कार्यक्रमास परिसरातील भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. प्रवचनानंतर सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सदर सोहळ्याचे आयोजन शशिकांत उषाताई देशमुख यांनी आपल्या मातोश्रींच्या स्मृतिप्रीत्यर्थ केले होते. त्या शशिकांत देशमुख यांच्या सासुबाई होत. कार्यक्रमास डॉ. विरेंद्र देशमुख, धीरज देशमुख, अमृता देशमुख तसेच प्राचार्य शहाजी देशमुख (इंजि.) यांच्यासह देशमुख परिवारातील सदस्य उपस्थित होते. ग्रामस्थ व भाविकांच्या सहभागामुळे कुकाणा गावात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून कै. पेरणाताई यांच्या स्मृतींना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.

## शिवरायांचे थोर विचार तरुणांनी आत्मसात करावे : राजेंद्र नागवडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : शिवरायांच्या धगधगत्या ज्योती बरोबर धगधगते विचार जीवनात अंगीकारल्यास महाराष्ट्रात शिवरायांना अपेक्षित असणारे स्वराज्य उभे राहिल्याशिवाय राहणार नाही. असा विश्वास सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी व्यक्त केला. वांगदरी येथील श्री छत्रपती ग्रुपच्या वतीने शिवरायांचे जन्मस्थान किल्ले शिवनेरी ते वांगदरी अशी ज्योत शिवजयंतीच्या निमित्ताने आणण्यात आली. सदर ज्योतीचे वांगदरी येथे स्वागत करताना नागवडे बोलत होते.

ते पुढे म्हणाले की, शिवरायांनी रयतेचे राज्य स्थापन केले. स्वराज्यातील प्रत्येक कुटुंब हे माझे कुटुंब आहे व प्रत्येक सदस्य हा माझ्या कुटुंबातील सदस्य आहे असे समजून राज्यकारभार केल्यामुळे आठरा पगड जातीतील लोकांना राजे आपले वाटत होते. त्यांच्याबद्दल प्रचंड विश्वास निर्माण झाल्यामुळे कुठल्याही भौतिक सुविधा



नसताना मावळे शिवाजी महाराजांच्या सैन्यात सामील झाले होते व त्यांनी प्राणपणाने साथ दिली म्हणूनच महाराजांना अलौकिक व अविस्मरणीय स्वराज्याची उभारणी करता आली. शिवाजी महाराजांचा तोच धगधगता विचार धगधगत्या ज्योती बरोबर आजच्या तरुणांनी अंगीकारल्यास निश्चितपणे शिवरायांना अपेक्षित असणारा समाज उभा राहू शकतो.

असे नागवडे म्हणाले. सदर प्रसंगी पंचायत समितीचे माजी सदस्य विठ्ठल आप्पा नागवडे, खरेदी विक्री संघाचे माजी संचालक साहेबराव महानोर, सरपंच सुजाता नागवडे, चेअरमन राजेंद्र नागवडे, माजी सरपंच आदेश नागवडे, संजय काका नागवडे, शिवाजी चोरमले, मारुती मदने, अशोक मासाळ, मुख्याध्यापक बापूराव भिसे, विष्णू आबा मोहिते, काशिनाथ पारखे, आप्पा टुले, हनुमंत काटे, विजय नागवडे, रामचंद्र गवळी यांच्यासह वांगदरी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील प्रा. योगेश शेलार यांचे प्रेरणादायी व्याख्यान झाले. प्रास्ताविक किरण नागवडे यांनी केले तर सरपंच सुजाता नागवडे यांनी आभार मानले. माजी सरपंच आदेश नागवडे यांनी उपस्थितांना स्नेहभोजनाची व्यवस्था केली.

## प्रत्येक कृतीतून समाजाला ज्ञानदानाचं काम करणे हेच आमचे स्वप्न : संतोष भोसले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : लोणी व्यंकनाथ परिसरात सहारा सर्वांगीण विकास संस्थेने एका आगळ्यावेगळ्या पद्धतीने सामाजिक उपक्रम आणि वाढदिवस साजरा करत सामाजिक बांधिलकीचा सुंदर संदेश देण्यात आला. छाया भोसले आणि संतोष भोसले यांची कन्या प्रणाली हिचा वाढदिवस केक-मेणबत्त्यांपुरता मर्यादित न ठेवता शैक्षणिक आणि सामाजिक जाणीवेने साजरा करण्यात आला. प्रणालीचा वाढदिवस जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दक्षिण काकडेवाडी तसेच श्री व्यंकनाथ विद्यालय व जुनिअर कॉलेज, लोणी व्यंकनाथ या दोन्ही शाळांना चळवळीतील वाचनीय अशी प्रत्येकी पाच पुस्तके भेट देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.

पुस्तक दानाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीला चालना मिळणार असून सामाजिक जाणीवेची बीजे रोवली गेली. कार्यक्रमात शेती विषयक मार्गदर्शन करण्यासाठी सुरज घोडके उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्यांसाठी पाणी व्यवस्थापनाचे महत्त्व, तसेच आधुनिक ड्रिप इरिगेशन पद्धतीची माहिती देत जलसंधारण व शाश्वत शेतीचा संदेश दिला. यावेळी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेतील मूल्यांवर विशेष प्रकाश टाकण्यात आला. आपण भारताचे लोक... या शब्दांनी सुरू होणाऱ्या उद्देशिकेचे



सामूहिक वाचन करण्यात आले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांची जाणीव करून देत आपण स्वतःला घेतलेल्या तीन शपथा उपस्थितांना सांगण्यात आल्या. वाढदिवसाचा हा उपक्रम समाजासाठी एक आदर्श ठरला असून वाढदिवस साजरा करायचा तर अशा विधायक पद्धतीने असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. यावेळी महेंद्र शिंदे, अनिल नेटवटे,दत्ता गोसावी, रवींद्र चव्हाण, म्हस्के सर, अजय सोनवणे, राहुल कोठारे, एनडी घोडके, सुरज घोडके, दत्ता मदने, पल्लवी सोनवणे, आसाराम काळे, नंदा काळे, बाजीराव काळे, कारु भोसले, पूजा काळे, आणि मोठया प्रमाणात महीला पुरूष व मुले उपस्थित होते.

## आशा क्षीरसागर यांना 'छत्रपती शिवाजी महाराज समाज रत्न पुरस्कार'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : सेवेची माती हाताला लागली की कामाला सोन्याची झळाळी येते आणि त्याच सेवेचा सन्मान म्हणजे समाज रत्न! आशा नारायण क्षीरसागर यांना राज्यस्तरीय छत्रपती शिवाजी महाराज समाज रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मेरा भारत व जिल्हा क्रीडा कार्यालय संलग्न, किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व नाना डोंगरे व्यायामशाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने १९ फेब्रुवारी रोजी परिवार मंगल कार्यालय, निमगाव वाघा (ता. जि. अहमदनगर) येथे छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त पाचवे राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य



संमेलन व पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला.

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) अंतर्गत क्रांतिज्योत लोकसंचालित साधन केंद्र येथे बचत गट उठझ म्हणून क्षीरसागर यांनी केलेल्या उल्लेखनीय, तळागाळातील महिलांना स्वावलंबनाकडे नेणाऱ्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. काम बोला, जाहिरात नको या जुन्या पद्धतीने त्यांनी केलेले काम आज राज्यस्तरावर पोहोचले- हीच खरी कमाई!या वेळी सुपा पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक ज्योती गडकरी, राष्ट्रपती पदक विजेते पोलीस निरीक्षक रतिलाल चौधर, कोतवाली पोलीस स्टेशनच्या उपनिरीक्षक तेजस्विनी थोरात, विशेष सरकारी वकील ड. सुरेश लगड, ज्येष्ठ अभिनेत्री गौरी रत्नपारखी, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, प्रसिद्ध नृत्यांगना सारिका नगरकर, कार्यक्रमाचे संयोजक नानासाहेब डोंगरे, कवी आनंद साळवे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## ढगाळ हवामान; अवकाळी पावसाच्या शक्यतेने शेतकरी चिंतातूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : मंगळवारी दुपारी कर्जत शहरात अचानक वातावरणात बदल घडत शहरासह परिसरातील गावात ढगाळ वातावरण निर्माण झाले. मागील दोन-तीन दिवसांपासून कर्जतमध्ये उन्हाची तीव्रता वाढल्याने उकाड्याची भर पडली होती. मात्र दुपारी अडीच वाजता ढगाळ वातावरण होत काही अंशी गार वारे वाहताना दिसले.

फेब्रुवारी महिना अंतिम टप्प्यात आला असून उन्हाळ्याची चाहुल लागली असताना सोमवारपासून पुन्हा एकदा वातावरणात बदल जाणवला गेला. सोमवारी संध्याकाळी ढगाळ वातावरण होत दमट हवामान झाले. मंगळवारी सकाळपासून उन्हाचा तडाखा चांगलाच जाणवत असताना दुपारी अडीच वाजता दुपारनंतर आकाशात ढगाळ वातावरण बनले. यामुळे उकाड्यात थोडी घट



होत हवामानात दमटपणा जाणवू लागला. काही प्रमाणात गार वारे देखील वाहिले. नुकतेच राज्य हवामान खात्याने महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्यात आणि तालुक्यात अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवला असून या वातावरणीय बदलाने सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

या ढगाळ वातावरणामुळे रब्बी पिकासह फळबागा व भाजीपाला पिकांवर परिणाम होऊ शकतो अशी प्रतिक्रिया कृषी जाणकार देत आहे. यंदा आंबा पिकास चांगला मोहोर लागला असून गारपीट अथवा अवकाळी पावसाचा दणका बसल्यास आंबा उत्पादकतेवर परिणाम जाणवू शकतो. मागील वर्षी मे महिन्यातच अवकाळी पावसाने कर्जतला चांगलेच झोडपत तब्बल १५ दिवसांत ३५० मिमीच्या पुढे नोंद लावली होती. यंदा फेब्रुवारी महिन्यातच अवकाळीचे संकट उभे राहिले आहे.

## दिव्यांग फसवणूक प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयात उच्चस्तरीय बैठक

**प्रतिनिधी । दादा सोनवणे**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील विविध आमिषे दाखवत दिव्यांग बांधवांची फसवणूक केल्याच्या बातम्या वृत्तपत्रातून प्रसारित झाल्यावर याची दखल मंत्रालय स्तरावर घेतली गेली असून या प्रकरणी मिळालेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत दोषीवर कडक कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत देण्यात आले आहेत.

श्रीगोंद्यात दिव्यांग नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक झाली असून यामध्ये शासकीय योजना, साहित्य वितरण, कर्जप्रकरणे आणि घरकुलाच्या आमिषातून झालेल्या कथित फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर मंत्रालयातून मिळालेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयात तातडीची उच्चस्तरीय बैठक पार पडली. संबंधित विभागप्रमुख, समाजकल्याण अधिकारी आणि पोलीस यंत्रणेचे प्रतिनिधी उपस्थित होते.बैठकीत प्राथमिक चौकशी अहवालांचा आढावा घेताना काही व्यवहारांमध्ये अनियमितता आढळल्याची माहिती समोर आली. लाभार्थ्यांकडून रक्कम उकळल्याचे, बनावट आश्वासने देऊन अर्ज प्रक्रियेचा गैरवापर केल्याचे मुद्दे नोंदवले गेले.

यासह बैठकीत सर्व प्रलंबित अर्जांची तपासणी व पडताळणी मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले लाभार्थ्यांची स्वतंत्र यादी तयार करून प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार तसेच दोषींविरुद्ध गुन्हे नोंदविण्याचे व शिस्तभंग कारवाईचे संकेत देण्यात आले आहेत हि कारवाई करून पुढील १५ दिवसांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत यावेळी सर्व अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, दिव्यांगांच्या हक्कांवर डल्ला मारणाऱ्यांना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. संबंधित प्रकरणात आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेण्यासाठी दस्तऐवज मागविण्यात आले आहेत.

### संघटनांची कारवाईची भूमिका

जिल्हातील दिव्यांग संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी बैठकीचे स्वागत करत वेगवान व पारदर्शक कारवाईची मागणी केली आहे. आश्वासन नव्हे, अंमलबजावणी हवी, असा सूर बैठकीनंतर उमटला.दिव्यांगांच्या हक्कांशी खेळ करणाऱ्यांसाठी आता प्रशासनाचा 'रेड सिग्नल' लागू शकतो. पुढील काही दिवसांत कारवाईची दिशा स्पष्ट होणार आहे.असेही दिव्यांग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी बोलताना सांगितले.

## ग्रामीण रुग्णालयात भव्य आरोग्य शिबिर संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**लिंपणगाव** : 'हिंद की चादर' गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालय येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात घारगाव येथील साईकृपा कृषी महाविद्यालय च्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (छडड) ६० स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदवला. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. शिबिरात सिकलसेल, मधुमेह, रक्तदाब, कर्करोग तपासणी, गर्भधारणा तपासणी, पोषण आहार मार्गदर्शन, बालकांचे लसीकरण तसेच आयुष्मान व वयवंदन योजना कार्ड वाटप आदी सेवा देण्यात आल्या. वैद्यकीय अधीक्षक डॉ. पूनम चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आरबीएसके पथक व रुग्णालय कर्मचाऱ्यांनी नियोजन केले. स्वयंसेवकांनी नावनोंदणीपासून रुग्णांना तपासणी कक्षापर्यंत मदत करून शिस्तबद्ध व्यवस्था राखली. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना विविध आरोग्य सेवा व शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळाला. महाविद्यालय प्रशासनाने याला सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण असल्याचे नमूद केले.

द•ख•ल

## माऊली समाधीला न्यायमूर्ती संजय करोल यांची भेट

**आळंदी :** आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर येथे संजय करोल यांनी भेट देऊन समाधीस्थळी दर्शन घेत प्रार्थना केली. मंदिरातील पवित्र वातावरण, स्वच्छता आणि सुयोग्य व्यवस्थापनाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या चरणी दर्शन घेण्याची संधी लाभल्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. सर्वांच्या कल्याणासाठी परमेश्वराने आशीर्वाद द्यावा, अशी भावना व्यक्त करत भारतीय संविधानातील तत्त्वांचे पालन करत जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी मार्गदर्शन लाभावे, अशी प्रार्थना त्यांनी केली.

या प्रसंगी विश्वस्त चैतन्य कबीर, पुरुषोत्तम पाटील तसेच व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर उपस्थित होते. न्यायमूर्ती करोल यांच्या भेटीबद्दल मंदिर प्रशासनाने आभार मानले.



## चमकोगिरी पेक्षा प्रत्यक्ष ग्राऊंड लेवल महत्वाची,

शिर्डी : साईबाबा शैक्षणिक संकुलामध्ये काल झालेल्या मद्यपी सुरक्षा रक्षकाच्या घटनेनंतर संकुलाची सुरक्षा व्यवस्थेचा विषय पुन्हा ऐरणीवर आला असून संरक्षण विभागाचा कारभार चव्हाट्यावर आला आहे . महाराष्ट्र राज्य पोलीस विभागाने साई संस्थानाला पोलीस उपनिरीक्षक दर्जाचा अधिकारी देत अति महत्वाचे असणारे संरक्षण अधिकारी या पदावर बसवला असून देश परदेशातून येणाऱ्या साई भक्तांची तसेच साई संस्थान मार्फत सुरू असणाऱ्या विविध संस्थांच्या कायदा आणि सुव्यवस्था ची जबाबदारी त्याचेवर सोपविण्यात आली आहे .

हे पद मिळणे हि साईबाबांची इच्छा असते आणि जो या पदावर बसतो तो अधिकारी स्वतः ला धन्य समजतो कारण बाबांच्या अशिर्वादा बरोबरच देश विदेशातील साई भक्ताबरोबरच येणारा देशातील सेलीब्रेटी , सरकार मधील मंत्री अधिकारी , न्याय संस्था व राजकीय लोकांशी चांगले संबंध निर्माण करता येतात याचा फायदा त्या अधिकाऱ्याला त्याच्या पुढील आयुष्यासाठी एक मोठी पर्वणी असते . आतापर्यंत ज्या ज्या अधिकाऱ्यांना या खुर्चीचा योग आला त्यांनी साई ची सेवा करत संरक्षण विभागाची योग्य रितीने नाव लौकिक वाढवत या पदाची गरिमा राखली गेली . त्यामुळेच साई संस्थान च्या कारभाराची चर्चा देशात नव्हे तर जगात होऊ लागली . परंतू मागील काही काळा पासून संरक्षण विभागाची शिस्त काही प्रमाणात ढासळत चालल्याचे अनेक घडलेल्य घटना मधून दिसून येत आहे . संरक्षण अधिकाऱ्यांच्या दिमतीला येवढे प्रचंड मनुष्यबळ असताना त्यांना शिस्त लावत चोख कामगीरी व ठोस निर्णय घेण्याची क्षमता असेल तर त्याचा परिणाम हि चांगला होतो. परंतू जसे आहे तसे चालू द्या कुणाला दुखवू नका आपले दिवस काढून घ्या असा पायंडा तयार झाल्यास तो संरक्षण अधिकारी फक्त त्याच्या खुर्ची पूरता काम करतो हे सिद्ध होते.

## शिंगवे येथील टॉयलेट बांधकाम निकृष्ट दर्जाचे

### पाणी न मारल्याची ग्रामस्थांची तक्रार

**शिंगवे (ता. आंबेगाव) :** येथील जिल्हा परिषद मॉडेल स्कूलमध्ये सुरू असलेल्या टॉयलेट युनिटच्या बांधकामाबाबत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हे बांधकाम सुरू असून, बांधकामाला आवश्यक तेवढे पाणी मारले जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित ठेकेदाराला याबाबत वारंवार सूचना देऊनही तो टाळाटाळ करत आहे. आज पाणी मारतो, उद्या पाणी मारतो, अशी कारणे देत वेळ काढला जात असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. पाणी न मारल्यामुळे बांधकामाचा रंग पांढरट पडला असून दर्जा निकृष्ट झाल्याचेही दिसून येत आहे. तसेच बांधकाम सरळ रेषेत नसून गुणवत्तेच्या निकषांनुसार होत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या संदर्भात पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात आले असता, संबंधित कामाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.
सदर टॉयलेटचे बांधकाम दर्जेदार व नियमानुसार पूर्ण करण्यात यावे, तसेच संबंधित ठेकेदाराला योग्य त्या सूचना देऊन कामाची पाहणी करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.



# पुणे जिल्हा परिषद शाळांचा राज्यस्तरीय मुल्यमापनात प्रथम क्रमांक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**नाझरे सुपे :** राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र यांच्या वतीने १९ जानेवारी २०२६ रोजी राज्यभर घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय शैक्षणिक मुल्यमापनात पुणे जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक शाळांनी उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. अधिकृत डॅशबोर्डवरील तुलनात्मक आकडेवारीनुसार जिल्हा परिषद शाळांच्या श्रेणीत पुणे जिल्ह्याने सर्व घटकांमध्ये उच्च गुणवत्ता सिद्ध केली आहे.

या यशामागे शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षण विस्तार अधिकारी आणि पालक यांचे संयुक्त प्रयत्न कारणीभूत ठरले आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षण, नियमित शैक्षणिक निरीक्षण आणि विद्यार्थी-केंद्रित उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे ही यशस्वी कामगिरी साध्य झाली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी आगामी काळातही शाळांची गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे तसेच शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांनी सर्व गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सर्व घटकांमध्ये सातत्यपूर्ण व उत्कृष्ट कामगिरी नोंदवत पुणे जिल्हा परिषद शाळांनी राज्यात आपले स्थान अधिक भक्कम केले आहे.

**मुल्यमापनातील निकाल पुढीलप्रमाणे :**
वाचन : ८३.१२% (राज्यात आघाडीवर)
लेखन : ८१.८५% (राज्यात आघाडीवर)
संख्याज्ञान : ९०.२९% (राज्यात आघाडीवर)
संख्येवरील क्रिया : ८६.७९% (राज्यात आघाडीवर)




पुणे जिल्हा परिषद इमारत गोलमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.गजान पाटील (भा.प्र.से) यांचा फोटो टाकावा

## संतोष जगताप यांची भाजप एनजीओ आघाडीच्या जिल्हा संयोजक पदी निवडम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**माळशिरस :** सासवड येथील स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष एकनाथ जगताप यांची भाजपच्या एनजीओ आघाडीचे जिल्हा संयोजक म्हणून निवड करण्यात आली आहे. पक्षाचे जिल्हाध्यक्ष शेखर वढणे यांनी जगताप यांना नुकतेच नियुक्तीचे पत्र दिले आहे. सासवड शहर अध्यक्ष आनंदभय्या जगताप, गिरीश जगताप,साकेत जगताप, भानुकाका जगताप, माधव शिवरकर, सचिन पठारे हे मान्यवर यावेळी उपस्थित होते



स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या माध्यमातून संतोष जगताप गेली १७ वर्षे सामाजिक कार्यात सहभागी आहेत. शालेय मुलांना शैक्षणिक साहित्य, सायकल वाटप फिरती प्रयोगशाळा, आरोग्य व रक्तदान शिबिर,वृक्षारोपण महिला सन्मान सोहळा, गरीब व गरजूंना धान्याचे किट वाटप,विद्यार्थ्यांसाठी मान्यवरांची व्याख्याने, आपत्ती काळात मदतकार्य, वाचन चळवळ राबवणे, आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण या आणि या सारख्या अनेक उपक्रमांचे आयोजन सातत्याने करत असतात त्यांच्या या कामाची दखल घेऊन त्यांची जिल्हा संयोजक म्हणून निवड करण्यात आली आहे जिल्हयातील सर्व एनजीओ व अन्य संस्था, शाळा, समाजातील विविध घटक यांचा समन्वय साधून उत्तम सुसंवाद साधण्यासाठी व व्यापक समाजोपयोगी उपक्रम राबविण्यासाठी, शासनाच्या विविध योजना तळागाळात पोहचवण्यासाठी आपण प्रयत्न करू असे जगताप यांनी निवडीनंतर स्पष्ट केले. त्यांच्या निवडीबद्दल सासवड सह पुरंदर तालुका व अन्य अनेक ठिकाणांहून त्यांचे अभिनंदनहोत आहे.

## इंद्रायणी प्रदूषणावर महापौर कार्यालयात आढावा बैठक

### स्वच्छतेपेक्षा प्रदूषणाच्या मुळावर घाव – कठोर कारवाईचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**पिंपरी :** इंद्रायणी नदीचे केवळ स्वच्छता अभियानांनी संवर्धन होणार नाही, तर प्रदूषणाच्या मुळावर घाव घालणे अत्यावश्यक आहे, असा ठाम निर्धार मंगळवारी महापौर कार्यालयात झालेल्या बैठकीत व्यक्त करण्यात आला. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि आळंदी नगरपरिषद यांच्यात इंद्रायणी नदी प्रदूषणाबाबत सविस्तर आढावा बैठक महापौर दालनात पार पडली.

औद्योगिक सांडपाणी, केमिकल्स तसेच सोसायट्यांचे अशुद्ध सांडपाणी इंद्रायणीमध्ये सोडले जाणार नाही, यासाठी कठोर आणि प्रभावी यंत्रणा उभी करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्या आणि संबंधित घटकांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही महापौर रवि लांडगे यांनी दिला. नदी स्वच्छ हवी असेल, तर निर्णयही तितकेच कठोर असणे गरजेचे आहे, असा एकमताने सूर बैठकीत उमटला.या बैठकीस पर्यावरण विभागाचे अधिकारी संजय कुलकर्णी, मुख्याधिकारी माधव खांडेकर, आळंदी नगरपरिषदचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे, नगरसेविका ऋतुजा तापकीर, साक्षी कुऱ्हाडे, पुजा घुंडरे, नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे, संतोष रासकर, पुणे भाजपा सचिव किरण येळवंडे, विवेक घुंडरे, अनिकेत तापकीर, संजय घुंडरे उपस्थित होते. इंद्रायणी नदीच्या शाश्वत संवर्धनासाठी दोन्ही प्रशासनांनी समन्वयाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.



## पुणे जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचा मुंबईत राज्यस्तरीय गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**नाझरे सुपे :** यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे आयोजित वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान २०२६ कार्यक्रमात पुणे जिल्ह्याला सहा राज्यस्तरीय गौरव पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आले.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर तसेच राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भक्ती विठ्ठलाची, सेवा आरोग्याची उपक्रमांतर्गत आळंदी/देहू ते पंढरपूर पालखी सोहळ्यात उत्कृष्ट नियोजन व नियंत्रण केल्याबद्दल जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे यांना सन्मानित करण्यात आले.

तसेच एबीडीएम ई-सुश्रुत व एचएमआयएसमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांना गौरविण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्र लोणीकाळभोर, वाघोली तसेच खेड तालुक्यातील राजगुरुनगर व कडूस येथील अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आशा सेविका व समूह संघटकांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आले.

=



फोटो ओळ: यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे आयोजित महाआरोग्य सन्मान कार्यक्रमात मंत्री प्रकाश आबिटकर व राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या हस्ते पुणे जिल्ह्यातील डॉ. रामचंद्र हंकारे व इतरांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करताना.

## खामुंडी ते बदगी बेलापूर रस्त्याचे काम प्रगतीपथावर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**आळेफाटा :** खामुंडी (ता. जुन्नर) ते बदगी बेलापूर या रस्त्याची गेल्या काही वर्षांपासून अत्यंत दुरवस्था झाली होती. ठिकठिकाणी खड्डे, उखडलेले डांबरीकरण आणि पावसाळ्यात चिखलामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. शालेय विद्यार्थी, शेतकरी तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांना या रस्त्यामुळे त्रास सहन करावा लागत होता.

ही बाब लक्षात घेत जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके यांनी पुढाकार घेत जिल्हा रस्ते निधीतून तब्बल ४२ लाख रुपयांचा निधी मंजूर करून घेतला. त्यांच्या प्रयत्नांमुळे या महत्त्वाच्या रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणाच्या कामास गती मिळाली आहे. सध्या रस्त्याचे काम वेगाने सुरू असून ओंकार कन्स्ट्रक्शन चे मालक बाळकृष्ण दिघे स्वतः कामाच्या ठिकाणी उपस्थित राहून कामाची पाहणी करत आहेत. उत्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरून मजबूत व टिकाऊ रस्ता तयार करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

ग्रामस्थांनी या कामाबद्दल समाधान व्यक्त केले असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागत आहे, अशी भावना व्यक्त केली जात आहे. रस्ता पूर्ण झाल्यानंतर खामुंडी व बदगी बेलापूर परिसरातील वाहतूक सुलभ होणार असून, शेतमाल वाहतुकीस मोठा दिलासा मिळणार आहे.

दरम्यान, काम नियोजित वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याचे आश्वासन संबंधित ठेकेदारांकडून देण्यात आले आहे. ग्रामस्थांच्या अपेक्षा पूर्ण करत हा रस्ता परिसराच्या विकासाला नवी चालना देणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.



## श्रीरामपूर-बेलापूर रस्त्याचे बायपासवर स्पीडबेकर्स टाकण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**बेलापूर:** श्रीरामपूर-बेलापूर रस्ता चौपदरी झाल्याने वाहने भरधाव वेगाने धावतात.बेलापूर बायपास येथे बेलापूर गावात जाणारी वाहने व बायपासने जाणारी वाहने यात गोंधळ होवून अपघात घडतात.त्यामुळे बेलापूर बायपास व निर्मळ हिस्पीटल या दोन ठिकाणी स्पीडब्रेकर्स करावेत अशी मागणी बेलापूर पत्रकार संघ,बेलापूर ग्रामपंचायत तसेच टक्सी असोशिएनने केली आहे. बेलापूर-श्रीरामपूर रस्ता हा चौपदरी असून अतिशय रहदारीचा आहे.या रस्त्यने भरधाव वेगाने वाहने धावतात.बेलापूर येथील नगर बायपास येथे श्रीरामपूरकडून येणारी वाहने व बायपासने श्रीरामपूरकडे जाणारी वाहने यात गोंधळ होतो.अनेकदा येथे अपघातही झाले आहेत. असे असल्याने हे क्षेत्र अपघात प्रवण बनलेले आहे. तरी नगरहून श्रीरामपूरकडे जाणाऱ्या वाहनांसाठी बेलापूर बायपास येथे तर श्रीरामपूरहून नगर व बेलापूर गावात जाणाऱ्या वाहनांच्या वेग नियंत्रणासाठी नमूद ठिकाणी स्पीडब्रेकर्स करणे आवश्यक आहे.

यासंदर्भात बेलापूर पत्रकार संघ,बेलापूर ग्रामपंचायत तसेच जिल्हा टक्सी असोसिएशन यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे संपर्क साधून मागणी केली आहे.ग्रामपंचायत व बेलापूर पोलिस औट पोस्टने लेखी मागणीही केली आहे. तरी सदर ठिकाणी स्पीड ब्रेकर्स करावेत अशी मागणी बेलापूर पत्रकार संघ,ग्रामपंचायत व टक्सी असोसिएशन यांनी केली आहे.

## जागतिक कर्करोग दिनानिमित्त केअर क्यूब कॅन्सर सेंटरचा रुग्ण सन्मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**पुणे :** केअर क्यूब कॅन्सर सेंटर, शिवाजीनगर यांच्या वतीने जागतिक कर्करोग दिनानिमित्त महिनाभर चालणाऱ्या कर्करोग जनजागृती मोहिमेचा प्रारंभ करण्यात आला. या निमित्त आयोजित विशेष रुग्ण सन्मान सोहळ्यात कर्करोगाशी लढा देणाऱ्या रुग्णांच्या जिद्दीचा गौरव करण्यात आला तसेच त्यांच्या कुटुंबियांच्या योगदानाची दखल घेण्यात आली.

संस्थापक डॉ. राम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी रुग्णसेवेत कार्यरत असलेल्या डॉ. जगदीश शेजूळ, डॉ. संजय एम. एच., डॉ. रितू दवे, डॉ. राहुल पाथडे, डॉ. अमित मुळे, डॉ. जाहीद मुलाणी, डॉ. प्रशांत चंद्रा, डॉ. पवन सोनावणे, डॉ. गौरव सुराळकर, डॉ. अजिता केंद्रे आणि डॉ. शिल्पा विद्वंस यांचा त्यांच्या समर्पित सेवेबद्दल सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी रंगूनवाला कॉलेजचे फेलोशिप विद्यार्थी डॉ. झैन आणि डॉ. कोमल यांना अभ्यासक्रम पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमास डॉ. विनोद व्ही. सी. आणि प्राचार्य डॉ. रमणदीप दुगल यांची प्रमुख उपस्थिती होती.

केंद्रात कॅन्सर सर्जरी, केमोथेरपी, रेडिएशन थेरपी, प्लास्टिक सर्जरी, स्पीच थेरपी, फिजिओथेरपी व आहार मार्गदर्शन अशा सर्वंकष सुविधा एकाच छताखाली उपलब्ध असून रुग्णांना वैयक्तिक लक्ष देऊन उपचार दिले जातात.फेब्रुवारी महिन्यात विविध ठिकाणी जनजागृतीपर व्याख्याने, कर्करोग तपासणी शिबिरे आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून लवकर निदान व वेळेवर उपचाराचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्यात आल्याची माहिती डॉ. राम पाटील यांनी दिली.



## दर शुक्रवारी बारामतीत महास्वच्छता अभियान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**बारामती :** बारामती शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०२६ मध्ये देशात प्रथम क्रमांक मिळविण्याच्या उद्देशाने बारामती नगर परिषदेतर्फे दर शुक्रवारी महास्वच्छता अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीचे सभापती नवनाथ बल्लाळ यांनी ही माहिती दिली.

संत गाडगेबाबा महाराज जयंतीनिमित्त नगरपरिषदेच्या कचरा डेपो येथे स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीची बैठक पार पडली. बैठकीस नगराध्यक्ष सचिन सातव, समिती सदस्य, आरोग्य विभाग प्रमुख यशराज बनसोडे, स्वच्छता निरीक्षक, शहर समन्वयक तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महास्वच्छता अभियानाची सुरुवात शुक्रवार (दि.२७) रोजी सकाळी ७.४५ वाजता विद्या प्रतिष्ठान येथील अजित पवार यांच्या समाधीस्थळास अभिवादन करून रुई गावठाण परिसरातून करण्यात येणार आहे. या अभियानात नागरिक, सेवाभावी संस्था, गणेश मंडळे, महिला बचत गट यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

बैठकीत सार्वजनिक शौचालये व मुतारींची स्वच्छता, घंटागाडी व्यवस्था, कचरा विलगीकरण, व्यावसायिक गाळेधारक तसेच मांस विक्रेत्यांकडून निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून शहर स्वच्छतेत सातत्य राखावे, असे निर्दे श देण्यात आले.

'माझी वसुंधरा' अभियानात सलग यश मिळाल्याबद्दल आरोग्य विभागातील कर्मचारी, मुकादम व स्वच्छता निरीक्षकांचे कौतुक करण्यात आले असून आगामी अभियानातही प्रथम क्रमांक मिळविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.



# गुन्हेगारांचा पोलिसांना खुला इशारा? जप्त स्कॉर्पिओ रातोरात लंपास

**सचिन दिनकर | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** शहर व तालुक्यात अवैध धंदे, लूटमार आणि चोऱ्यामाऱ्यांच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये आधीच भीतीचे वातावरण निर्माण झाले असताना आता थेट पोलिसांच्या ताब्यातील जप्त वाहनच पोलीस स्टेशनच्या आवारातून चोरीला गेल्याची अभूतपूर्व घटना उघडकीस आली आहे.

गुन्हेगारांनी पोलिसांनाच खुले आव्हान दिल्याची चर्चा शहरभर रंगली असून या प्रकारामुळे पोलिसांच्या सुरक्षा व्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे चित्र समोर आले आहे.

वृद्धेश्वर येथे दर्शनासाठी गेलेल्या भाविकांना लोहसर शिवारात अडवून मारहाण करत लूटमार करण्यात आली होती. या गंभीर गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखा आणि जिल्हा पोलिसांच्या मदतीने पाथर्डी पोलिसांनी वेगाने सुरू केला होता. तपासादरम्यान सराईत आरोपी निष्पन्न झाला; मात्र आरोपी फरार असल्याने त्याच्या मालकीची काळ्या रंगाची महिंद्रा कंपनीची स्कार्पिओ (एमएच-१६ डीएस-१०७०) पोलिसांनी जप्त करून मुद्देमाल म्हणून पोलीस स्टेशनच्या आवारात उभी केली होती. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच पाथर्डी पोलीस स्टेशनचे माणिकदवंडी रोडवरील नव्या इमारतीत स्थलांतर झाले. नगर रोडवरील जुन्या इमारतीत सध्या कच्च्या कैद्यांसाठी तुरुंग व्यवस्था सुरू




जुन्या पोलीस ठाण्याच्या आवारातून स्कार्पिओ गाडी चोरी प्रकरणाचा तपास या गुन्ह्यातील आरोपी भोवतीच केंद्रित असून त्याच्याशिवाय कोणीही गाडी नेऊ शकत नाही. गाडीला दोन चाव्या असतात एक चावी पोलिसांकडे व दुसरी चावी आरोपीकडे निश्चित असेल त्यामुळे तो तपास लवकरच पूर्ण होईल. या गुन्ह्यातील आणखी आरोपींची नावे निष्पन्न झाले असून त्या दृष्टीने पोलीस पथके कार्यरत झाली आहेत.

**– विलास पुजारी,पोलीस निरीक्षक**

असून मोकळ्या जागेत जप्त व अपघातग्रस्त वाहने ठेवण्यात आली आहेत. स्थलांतराच्या गडबडीत मागील आठ दिवसांपासून सामान, कागदपत्रे आणि फर्निचर हलविण्याचे काम सुरू होते. याच काळात आवारातील लाईट आणि सीसीटीव्ही बंद असल्याची माहिती मिळवत चोरट्यांनी संधी साधल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

सोमवारी रात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने पोलिसांच्या ताब्यातील ही स्कार्पिओ थेट पोलीस स्टेशनच्या आवारातूनच चोरून नेली. विशेष म्हणजे, पोलिसांच्या नजरेआड इतकी मोठी गाडी सहजपणे घेऊन जाण्याचे धाडस गुन्हेगारांनी कसे केले, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आज सकाळी कार्यालयीन पाहणीदरम्यान तपासी अंमलदार देविदास खैरे यांच्या निदर्शनास गाडी नसल्याचे आल्यानंतर खळबळ उडाली. त्यानंतर त्यांनी अधिकृत तक्रार दाखल केली असून चोरी नेमकी कोणत्या दिवशी झाली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

पोलिसांच्या ताब्यातील मुद्देमाल सुरक्षित राहिला नाही, तर सामान्य नागरिकांनी सुरक्षेचा विश्वास कुणावर ठेवायचा, असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत. या घटनेमुळे केवळ चोरीचा गुन्हा नव्हे तर पोलिसांच्या अंतर्गत सुरक्षाव्यवस्थेतील त्रुटीही उघड झाल्या आहेत.

## द•ख•ल

### जनशिक्षण संस्थेच्या प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरण



**अहिल्यानगर :** महिलांना कौशल्याधारित प्रशिक्षण देत आत्मनिर्भरतेकडे वाटचाल घडविणाऱ्या जनशिक्षण संस्था संचलित रुपाली फॅशन इन्स्टिट्यूटच्या प्रशिक्षणार्थींना राहुरी येथे प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाला माजी नगराध्यक्षा उषाताई तनपुरे, प्रभारी संचालक शफाकत सय्यद, कार्यक्रम अधिकारी कुंदा शिंदे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) चे वरिष्ठ संशोधन अधिकारी दिलावर सय्यद यांची उपस्थिती होती.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. प्रशिक्षणार्थी महिलांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तूंचे प्रदर्शनही यावेळी करण्यात आले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शिक्षण नव्हे, तर कौशल्य अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन शफाकत सय्यद यांनी केले. शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन महिलांनी लघुउद्योग, शिवणकाम, फॅशन डिझाईनिंग आदी क्षेत्रांत व्यवसाय सुरू करावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी यशस्वी प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गितीका इंगळे यांनी केले.

### श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता कार्यशाळा

**नेवासा :** नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय येथे 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उच्च शिक्षण' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग व महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने सोमवार (दि. २३ फेब्रुवारी) रोजी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे २५० विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमास उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

कार्यशाळेत कोल्हार येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागप्रमुख डॉ. अनिल पवार यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे काय, तिचा उच्च शिक्षणातील विविध विषयांमध्ये व संशोधन प्रक्रियेत कसा उपयोग होऊ शकतो, याबाबत प्रात्यक्षिकांसह सविस्तर माहिती दिली. कृत्रिम बुद्धिमत्ता हा भविष्यातील अत्यावश्यक विषय असून विद्यार्थ्यांनी स्वअभ्यास व कौशल्यविकासावर भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही समान लाभ द्या : आ. आशुतोष काळे

**कोळपेवाडी :** लहरी हवामान व शेतमालाच्या अनिश्चित दरामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडत असल्याने कर्जमाफीची नितांत गरज असल्याचे मत आमदार आशुतोष काळे यांनी व्यक्त केले. मात्र कर्जमाफी करताना नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही तेवढाच मोबदला मिळावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी शेतकरी कर्जमाफी समितीचे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांना निवेदन दिले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, थकीत कर्जदार शेतकऱ्यांना दिलासा देणे आवश्यक असले तरी अत्यंत कठीण परिस्थितीतही वेळेवर कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय होता कामा नये. यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांमध्ये नियमित कर्जफेड करणाऱ्यांना तुलनात्मक लाभ मिळालेला नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे शासनाने धोरण ठरविताना प्रामाणिक शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन समान लाभ देण्याचा निर्णय घ्यावा, अशी आग्रही मागणी आ. काळे यांनी केली आहे.

### सामाजिक एकोप्यातून ग्रामविकास शक्य : डॉ. गोकुळदास गायकवाड

**अहिल्यानगर :** साहासी, स्वच्छ मन, स्पष्ट विचार व निडर युवक राष्ट्राच्या भविष्याची निर्मिती करू शकतो. शिक्षणाबरोबरच सोबत आपले कलागुण जोपासायला हवेत, तसेच सामाजिक एकोप्यातून ग्रामविकास साधता येईल असा मूलमंत्र डॉ. गोकुळदास गायकवाड यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांना दिला. महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित डॉ. विखे पाटील कृषि महाविद्यालय विळद घाट येथे २२ ते २८ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले आहे.

# संत गाडगेबाबांनी समाजाला स्वावलंबी व सुशिक्षित बनवले : इंगावले



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अमरापूर :** श्री मारुतरावजी घुले शिक्षण संस्थेचे दहेश्वर माध्यमिक विद्यालय दहिफळ जूने ता शेवगाव आज विद्यालयात राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची १५१ वी जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्ष नंदु पा भोसले हे होते (शा.व्य.समिती अध्यक्ष) या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक इंगावले सर व नंदु पा भोसले यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काटे संचिता, दळे अनुष्का, जाधव सारिका, विखे साक्षी, हाके वैष्णवी, मगर शर्वरी, भारस्कर जयश्री, फुंदे समर्थ, काळे आदित्य यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर मनोगत व्यक्त केले इंगावले सरांनी सागितले की संत गाडगे महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून जनतेला स्वच्छता, शिक्षण आणि मानवता धर्माचा उपदेश दिला. देव दगडात नसून माणसांत आहे हे सांगून त्यांनी अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, जातिभेद आणि प्राण्यांची हत्या नाकारली त्यांनी साधे राहणे, चोरी न करणे, व्यसनांपासून दूर राहणे मुलामुलींना शाळेत पाठवण्याचा मोलाचा संदेश देवून शिक्षणाचा आग्रह धरला भुकल्यांना अन्न तहानलेल्यांना पाणी, निवार्याविना असणाऱ्यांना घर आणि मुक्या प्राण्यांचे रक्षण करा ही शिकवण दिली.

गाडगे महारांजानी या विचारांतून समाजाला स्वावलंबी व सुशिक्षित बनवण्याचे कार्य केले असे सांगून अभिवादन केले अध्यक्षीय भाषणात नंदु पा भोसले यांनी गाडगे महारांजानी केलेल्या जीवन कार्याविषयी माहिती सांगून विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा अभ्यास करावा असे प्रतिपादन करून जयंतीच्या शुभेच्छा देवून अभिवादन केले.

या प्रसंगी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक बाळासाहेब तुपविहिरे, विकास राऊत, भाऊसाहेब बर्डे, प्रमिला बोडखे, यशोदास वाघमारे, विशाल जोशी, विकास व्यवहारे, आनंद गांधी शिक्षक-पालक संघ- उपाध्यक्ष, देविदास आरगळे, गोरख लिंभोरे विद्यार्थी पालक उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन वाघमारे यांनी केले आणि आभार बर्डे यांनी व्यक्त केले.

# राहुरी कृषि विद्यापीठाचा 'ए.आय.फॉर ॲग्री' या जागतिक परिषदेमध्ये सन्मान




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** मुंबईत सुरु असलेल्या ए.आय. फॉर ॲग्री आणि गुंतवणुकदार जागतिक परिषद-२०२६ या परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रोग आणि किडींची ओळख या कृत्रिम बुध्दिमत्तेवर आधारीत पचे अनावरण करण्यात आले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे आणि संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली या ए.आय. पसाठी माहिती तयार करण्यात आली होती.

विद्यापीठाच्या या योगदानाबद्दल यावेळी कुलगुरु डॉ. विलास खर्चे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. पोकरा, कृषि विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि टेक्नॉलॉजी इनोव्हेशन हब, आय. आय.टी., मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने या पची निर्मिती करण्यात आली. कृषि विभागाचे लोकप्रिय महाविस्तार मोबाईल पमध्ये या रोग आणि किडींची ओळख या पचा अंतर्भाव करण्यात आला आहे. यामुळे विविध पिकांवरील रोग आणि किड यांचे फोटोवरुन शेतकर्यांना त्यांच्या पिकांवरील रोग व किडींचे निदान करुन त्यांच्या नियंत्रणाकरीता उपाययोजना त्वरीत सुचवल्या जातील. या पमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांवरील रोग आणि किडींचे वेळेवर अचूक निदान व त्यावरील उपाय यामुळे त्यांचा औषधांवरील खर्च कमी होण्यास मदत होणार आहे.

सध्या या पमध्ये १८ पिकांचे विविध ६९ रोग आणि ३५ किडींची पूर्ण माहिती समाविष्ट करण्यात आली आहे. या ॲपमध्ये राज्यातील उर्वरीत पिकांवरील किडी आणि रोगांची माहिती लवकरच समाविष्ट करण्यात येणार आहे.

या पमध्ये योगदान दिल्याबद्दल महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी किड व रोग शास्त्रज्ञ, कृषि अभियांत्रिकी आणि इतर संबंधीत प्राध्यापक ज्यांनी या पसाठी योगदान दिले आहे त्यांचे अभिनंदन केले आहे.

# साईबाबा हॉस्पिटलमध्ये ४ किलोचा महाकाय ट्युमर काढण्यात यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एक अतिशय गुंतागुंतीची आव्हानात्मक शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी हॉस्पिटलमधील जनरल सर्जन डॉ. अजिंक्य पानगव्हाणे व त्यांच्या टीमने रुग्णाच्या पोटातून तब्बल चार किलो वजनाचा ट्यूमर सर्जरी करून यशस्वीरीत्या काढून मोठे वैद्यकीय यश संपादन केले आहे. निकिता गायकवाड राहणार कोपरगाव वय २७ ह्या रुग्णाला बाळंतपणानंतर गेल्या काही दिवसांपासून पोटात तीव्र वेदना व सूज जाणवत होती. त्या तपासणी करिता श्री साईबाबा हॉस्पिटल शिर्डी येथे डॉक्टर अजिंक्य पानगव्हाणे यांच्या कडे आल्या असता तपासणीनंतर त्यांच्या पोटामध्ये मोठ्या आकाराचा ट्यूमर असल्याचे निदान झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. डॉ. अजिंक्य पानगव्हाणे व भूलतज्ञ डॉ निहार जोशी यांच्या कुशल नेतृत्वाखाली श्री साईबाबा हॉस्पिटल मधील वैद्यकीय टीमने अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने शस्त्रक्रिया पूर्ण केली. या शस्त्रक्रियेमध्ये श्रद्धा, सबुरी आणि शस्त्रकौशल्याची सांगड झाल्याचे दिसून येते. सध्या रुग्णाची प्रकृती पूर्णतः स्थिर असल्याकारणाने व समाधानकारीत्या सुधारल्यामुळे डॉक्टरांनी त्यांना नुकताच डिस्चार्ज दिला. आधुनिक तंत्रामुळे शस्त्रक्रिया कमी वेदनादायक, कमी रक्तस्रावाची आणि जलद पुनर्वसनाची ठरली आहे. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये उपलब्ध आधुनिक वैद्यकीय सुविधा आणि अनुभवी डॉक्टरांमुळे परिसरातील रुग्णांना मोठा आधार व दिलासा मिळत आहे. रुग्णाच्या कुटुंबीयांनी डॉक्टर व संपूर्ण वैद्यकीय टीमचे मनःपूर्वक आभार मानले असून, डॉ. अजिंक्य पानगव्हाणे भूलतज्ञ डॉ. निहार जोशी व जनरल सर्जरी विभागातील सर्व कर्मचाऱ्यांचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी कौतुक केले.



# रस्त्याच्या नामकरणास महापालिकेची मंजुरी

**अहिल्यानगर :** प्रभाग क्र. १३ मधील सक्कर चौक ते काटवन खंडोबा चौक या महत्त्वाच्या रस्त्याचे नामकरण माजी आ. स्व. अरूणकाका बलभिमराव जगताप (काका) मार्ग असे करण्यास अहिल्यानगर महानगरपालिका ने मंजुरी दिली आहे.



महापौर ज्योतीताई गाडे व उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते नामकरण पत्र प्रा. माणिक विधाते यांना प्रदान करण्यात आले.

शहराच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे अरूणकाका बलभिमराव जगताप यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा निर्णय घेण्यात आला. परिसरातील नागरिक, व्यापारी व सामाजिक संस्थांनी रस्त्याला त्यांचे नाव देण्याची मागणी केली होती. प्रा. माणिक विधाते व राजेंद्र पडोळे यांच्या माध्यमातून प्रस्ताव महापालिकेकडे सादर करण्यात आला होता.

महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत मानक कार्यपद्धतीनुसार प्रस्तावास मान्यता देण्यात आली. महासभेच्या अधिकारांतर्गत प्रशासकांनी ठराव मंजूर केला.

अरूणकाका जगताप हे शहराच्या विकासाचा पाया होते. त्यांच्या कार्याची आठवण जपण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे, असे प्रा. विधाते यांनी सांगितले. लवकरच नामफलकाचे अनावरण करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

# ढोरजळगांव ग्रामपंचायतीला विमाग्राम पुरस्कार प्रदान

**ढोरजळगांव :** शेवगाव तालुक्यातील ढोरजळगांव शे ग्रामपंचायतीला भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून ५० हजार रुपयांचा विमाग्राम पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

भारतीय आयुर्विमा महामंडळ अहिल्यानगरचे वरिष्ठ शाखाधिकारी दिलीप कटके, चंद्रशेखर सोनवणे उपशाखाधिकारी, सुनील पाटील विकास अधिकारी आणि विमा प्रतिनिधी गणेश वंगार, नितीन पाटील, सौ.अश्विनी पाटील, सौ.रेणुका वंगार,सौ.जयश्री घोडके यांच्याकडून हा पुरस्कार गावच्या सरपंच सौ सुवर्णा देविदास गि-हे व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये देण्यात आला. यावेळी भारतीय आयुर्विमा महामंडळाचे शाखा अधिकारी दिलीप कटके, सुनील पाटील यांनी एलआयसीच्या विविध योजनांची




माहिती तळागाळापर्यंत पोहोचवल्यामुळे तसेच ग्रामस्थांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळेच हा पुरस्कार मिळाल्याचे बोलताना सांगितले. यावेळी डॉ सुधाकर लांडे,राजेंद्र देशमुख यांनी एलआयसीचे मानवी जीवनातील महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी भाऊसाहेब अकोलकर, गणेश पाटेकर, उपसरपंच रोहन साबळे, पांडुरंग सांगळे, किरण पाटेकर,दिगंबर साबळे, देविदास गि-हे, पोपट गि-हे, सुभाष काशिद, अतुल लांडे, भिमराव साबळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी ग्राम पंचायतच्या वतीने एलआयसीच्या कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

# हमालांच्या 'चहापाणी' सल्ल्याने रेशन बैठकीत खळबळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** जिल्हा पुरवठा अधिकारी हेमलता बडे यांनी श्रीगोंद्यातील रेशन दुकानदारांची आढावा बैठक घेतली त्यावेळी दुकानदाराना बोलताना त्यांनी सांगितले, वाहतूकदार गोडाऊनमधील हमाल यांच्या चहापाणी करण्याचा अजब सल्ला दिल्याने बैठकीत संभ्रम निर्माण झाला.

जिल्हा पुरवठा अधिकारी हेमलता बडे यांनी आज श्रीगोंद्यातील पेडगाव रोडवरील धान्य गोडाऊन मध्ये स्वस्त धान्य दुकानदारांची बैठक ठेवली होती त्यावेळी कागदपत्रे, स्टॉक नोंदी आणि वितरण प्रक्रियेची झाडाझडती घेतली. त्यावेळी रेशन दुकानदारांच्या तक्रारी, स्टॉक तफावत आणि वेळेवर वितरण यावर कठोर शब्दांत मार्गदर्शन.केले आहे तसेच वाहतूक व हमाली खर्चाबाबत चर्चा करण्यात आली आणि त्याच वेळी चहापाणी संदर्भातील सूचनेची चर्चा बाहेर.बैठकीत नियमपालनाबाबत कडक सूचना देण्यात आल्या मात्र याच वेळी एक चहापाणी चा अजब सल्लाही दिल्याची चर्चा रंगली आहे. बैठकीत दुकानदारांनी गोदाम तसेच वाहतुकीच्या बाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी केल्यावर बैठकीदरम्यान हमाल व वाहतूकदार यांना खुशीने शंभर-दोनशे चहापाणी द्या असा मौखिक सल्ला अधिकाऱ्यांनी दिल्याचा आरोप काही दुकानदारांनी केला.

प्रशासनाच्या बैठकीतून असा संदेश जाणे योग्य आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.मात्र यामुळे श्रीगोंद्यात चांगलीच खळबळ उडाली आहे काही दुकानदार म्हणतात, नियम पाळा, कागदपत्रे ठेवाहे ठीक आहे; पण चहापाणीचा उल्लेख प्रशासनाच्या बैठकीत का? तर दुसरीकडे काहींचे म्हणणे, हा केवळ सौजन्याचा भाग असू शकतो. असेही बोलले जात होते.



## प्रश्नाचे ढग

- सरकारी यंत्रणेत 'चहापाणी'चा सल्ला म्हणजे अनौपचारिक प्रोत्साहन की शिष्टाचार?
- असा सल्ला देणे शासकीय आचारसंहितेला धरून आहे का?
- यामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह तर निर्माण होत नाही ना?

## अश्या वक्तव्याने ताटातला घास संशयाच्या सावलीत जाईल : नागरिक

या कथित वक्तव्याबाबत अधिकृत स्पष्टीकरण अद्याप समोर आलेले नाही. जर असा सल्ला दिला गेला असेल, तर त्यामागचा उद्देश स्पष्ट व्हावा, अशी मागणी होत आहे. रेशन व्यवस्थेत शिस्त हवीच; पण शिस्तीबरोबर संदेशही स्वच्छ हवा. नाहीतर जनतेच्या ताटातला घासही संशयाच्या सावलीत जाईल.असे जनतेतून खुलेआम बोलले जात आहोत या बैठकीच्या चहापाणीवर प्रशासन स्पष्टतेचा पाणी घालते का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
बुधवार, दि.२५ फेब्रुवारी २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

## संगमनेरात तरुणावर कोयत्याने प्राणघातक हल्ला

**संगमनेर :** संगमनेर शहरातील इंदिरानगर परिसरात सुरू असलेल्या क्रिकेट मॅच च्या ग्राउंडवरती हल्लेखोराने रोहित वाळके या तरुणावरती कोयत्याने जीवघेणा हल्ला करून त्याला गंभीर रित्या जखमी केली आहे. गंभीर जखमी अवस्थेत त्यास एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे. या प्रकरणी संगमनेर शहर पोलिसात चार जणांच्या विरोधात विविध कलमाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे एकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे तर तीन जण फरार आहे.

या प्रकरणी जखमी रोहित वाळके यांची पत्नी ममता वाळके यांनी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अथर्व रासने, ओम काथे, साहिल देवरे, सुमित शेवंती आणि शैलेश रोकडे या पाच जणां विरुद्ध गंभीरकलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी एका संशयितास शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याबाबत अधिक तपास पो नि समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक इरफान खान करीत आहेत.

### अतिक्रमणप्रश्नी आ. ओगले, नगराध्यक्ष ससाणे यांचे जलसंपदामंत्र्यांना साकडे

## श्रीरामपूरकरांवर अन्याय होणार नाही : ना. विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री







**श्रीरामपूर :** श्रीरामपूर नगरपरिषद हद्दीतील जलसंपदा विभागाच्या जागेवरील रहिवाशी व व्यापाऱ्यांना जलसंपदा विभागाने अतिक्रमण काढणेकामी नोटीसा बजावल्याने नागरिक भयभीत झाले आहे. त्याच पार्श्वभूमीवर आमदार हेमंत ओगले आणि नगराध्यक्ष करण ससाणे यांनी जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मुंबईत भेट घेऊन निवेदन दिले आहे. श्रीराम पूरकरांवर अन्याय होणार नाही, असे सांगत जलसंपदा मंत्री विखे यांनी दिलासा दिला.

निवेदनावर विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते सतेज पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांच्या सह्या आहेत.

निवेदनात म्हटले आहे की, श्रीरामपूर नगर परिषद हद्दीत जलसंपदा विभागाच्या जागेमध्ये सुमारे ३० ते ४० वर्षांपासून नागरिक वास्तव्यास आहेत तसेच छोटा मोठा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करत आहेत जलसंपदा विभागाने अतिक्रमण काढण्याच्या संदर्भात दिलेल्या नोटीशीमुळे मोठ्या प्रमाणात नागरिक भयभीत झाले आहे. सदर नागरिक हातावर काम करणाऱ्या असून अतिक्रमण काढल्यास त्यांचे संसार उघड्यावर येणार आहेत त्यातच सध्या इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू आहेत त्यामुळे नागरिकांबरोबरच विद्यार्थी देखील घाबरले आहेत.


नगर विकास विभागाच्या दिनांक ६ मार्च २०१९ च्या शासन निर्णयानुसार सदर रहिवाशी प्रयोजनासाठी श्रीरामपूर येथील जलसंपदा विभागाच्या जागेवर असलेले अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर तातडीने बैठक घ्यावी व सध्या दिलेल्या नोटिशींना स्थगिती द्यावी अशी मागणी आमदार ओगले आणि नगराध्यक्ष ससाणे यांनी केली आहे.

यावेळी मंत्री विखे पाटील यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला असून कोणावरही अन्याय होणार नाही, असे आश्वासन दिले आहे.

### वाढत्या सायबर गुन्हेगारीवर आ. आशुतोष काळेंचा

## ८७ लाखांच्या फसवणूक प्रकरणी सरकारला जाब

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**कोळपेवाडी :** राज्यात वाढत्या सायबर गुन्हेगारीच्या घटनांमुळे सर्वसामान्य नागरिकांची आयुष्यभराची कमाई धोक्यात येत असल्याचा मुद्दा उपस्थित करत आमदार आशुतोष काळे यांनी मंगळवार (दि.२४) रोजी २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला.

कोपरगाव शहरातील एका सेवानिवृत्त दाम्पत्याची 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली ८७ लाख ३० हजार ४०० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला होता. हा गुन्हा तत्काळ सायबर विभागाकडे का वर्ग करण्यात आला नाही, तो १८ दिवस उशिरा का नोंदवला गेला, तसेच होल्डवरील ७८ लाखांव्यतिरिक्त उर्वरित ९ लाखांबाबत काय कारवाई केली, असे प्रश्न त्यांनी सभागृहात उपस्थित केले.

राज्याचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देताना सांगितले की, सायबर क्राईम विभागाने ७८ लाख रुपयांवर होल्ड लावला असून उर्वरित रकमेची पडताळणी सुरू आहे. संबंधित रक्कम परत मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सायबर गुन्ह्यांबाबत विविध देशांशी करार असल्याने काही प्रकरणांत रक्कम परत मिळविणे शक्य होते; मात्र करार नसलेल्या देशांत अडचणी येतात, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, या प्रश्नामुळे सायबर गुन्हेगारीविरोधात अधिक ठोस उपाययोजना होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

फोटो ओळ: आमदार आशुतोष काळे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सायबर गुन्हेगारीविषयी तारांकित प्रश्न उपस्थित केला.

## विवाहितेचा छळ इंजिनिअर पतीवर गुन्हा

**नेवासा :** विवाहानंतर सतत मानसिक व शारीरिक छळ करून आई-वडिलांकडून पाच लाख रुपये आणण्याची मागणी केल्याप्रकरणी पतीसह सासरच्या चौघांविरुद्ध नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई २३ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित विवाहितेचा विवाह २ जून २०१९ रोजी झाला होता. विवाहानंतर पती व सासरच्या मंडळींकडून तिला वेळोवेळी मारहाण, शिवीगाळ तसेच मानसिक छळ करण्यात येत असल्याची तक्रार आहे. आई-वडिलांकडून शेती घेण्यासाठी पाच लाख रुपये घेऊन ये असा दबाव टाकण्यात येत होता. तसेच दागिने व इतर वस्तू परत देण्यास नकार देत त्रास दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी पिंपरी चिंचवड येथील रहिवासी असलेले पीडिताचे पती अतिश भगवान वाघ, भगवान गेणु वाघ अनीता भगवान वाघ, नम्रता भगवान वाघ नितीश भगवान वाघ या आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकार २ जून २०१९ ते ६ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत घडल्याचे तक्रारीत नमूद असून, समेटाचे प्रयत्न निष्फळ ठरल्यानंतर अखेर नेवासा पोलिसांत गुन्हा नोंदविण्यात आला. पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, समाज एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करत असताना हुंडाबळी व पैशांच्या मागण्यांसारख्या घटना संबंधितांच्या खालावलेल्या मानसिकतेचे द्योतक असल्याचा आरोप पीडित महिला व तिच्या नातेवाईकांनी केला आहे.

### दोन हजार नळ धारकांकडे १ कोटी थकबाकी

## नळजोड खंडित करण्याचा स्थायी समितीचा निर्णय

शफीक बागवान । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर नगरपालिका हद्दीबाहेरील उपनगरातील सुमारे दोन हजार नळ जोड खंडित करण्यात येणार असून काही ठिकाणी ही प्रक्रिया सुरू झाली आहे. शहराच्या हद्दीबाहेरील या नळ जोड धारकांकडे पालिकेची सुमारे एक कोटी रुपयाहून अधिक थकबाकी असल्याचे समजते. पालिकेच्या स्थायी समिती सदस्यांच् बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

भैरवनाथनगर, डावखरवस्ती, रामचंद्रनगर, विद्याविहार शिक्षक सोसायटी, गायकवाड वस्ती, हॉटेल गझल पाठीमागील भाग गोंधवणी चा काही भाग तसेच शिरसगाव हद्दीतील काही भाग आणि बुवा मंगल कार्यालय अशा परिसरातील शहराच्या उपनगरातील नळ जोड खंडीत करण्यात येणार आहे.

सदरच्या नळ धारकांकडे



गेल्या अनेक वर्षांपासून ही थकबाकी असून वारंवार विनंती करूनही ती भरण्यात आली नाही.

उपरोक्त सर्व उपनगरातील ग्राम पंचायतींनी श्रीरामपूर नगरपालिकेला पाणी देण्या संदर्भात विनंती आणि ग्रामपंचायतीचे ठरावही दिले होते. याबरोबरच वसुलीचेही हमीपत्र या ग्रामपंचायतीने दिले होते. मात्र त्यांनी तो शब्द पाळला नसल्याने पालिकेला हा कटू निर्णय घ्यावा लागला आहे, असे पालिकेकडून सांगण्यात आले.

मानवतेच्या दृष्टिकोनातून श्रीराम पूर नगरपालिका हद्दीतील उपरोक्त उपनगरातील रहिवाशांना पिण्याच्या पाण्याचे कनेक्शन देण्यात आले होते, मात्र ग्रामपंचायतींनी या नळ जोड कनेक्शन धारकांची वसुली पालिकेला अदा केली नाही.

दरम्यान नळ जोड खंडित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सद्यस्थितीत श्रीरामपूर नगरपालिका पिण्याच्या पाण्यासंदर्भात मोठा सामना करीत आहे. शहराला पिण्याच्या पाण्याची चणचण भासत असून काही कारणास्तव पालिकेच्या हद्दीबाहेरील उपनगरातील थकीत नळ जोड धारकांचे कनेक्शन कट करण्याचा निर्णय हा अपरिहार्य असल्याचे पालिकेकडून सांगण्यात आले आहे.

## वैजापूर येवला रस्त्यावर अपघात; दोन जखमी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** कंटेनरने कारला समोरून धडक दिल्याने कारमधील दोर्घीं जखमी झाल्याची घटना २१ फेब्रुवारीला पहाटे वैजापूर येवला रस्त्यावर नांदगाव शिवारात घडली. प्रदीप बाबासाहेब बिक्कड व राहुल गोरख बिक्कड (दोघे रा.नाहोली तालुका केज जिल्हा बीड) अशी जखमीची नावे असून त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील खासगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रदीप व राहुल हे दोघे मित्र २० फेब्रुवारीला रात्री साडे दहा वाजतात्यांच्या ब्रेझा कारमधून (एमएच ०९ ईयु २५४७) राहत्या घरून येवला येथील दराडे कॉलेजवर काम असल्याने येवलाच्या दिशेने निघाले होते. पहाटे सव्वा चार वाजेच्या सुमारास त्यांची गाडी वैजापूर येवला रस्त्यावर नांदगाव शिवारात आल्यानंतर समोरून येणाऱ्या कंटेनर ट्रकने (टी एन ०४ बी एच २६१६) जोराची धडक दिली. या अपघातात प्रदीप व राहुल हे दोघे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर वैजापूरच्या सामान्य रुग्णालयात उपचार केल्यानंतर त्याना संभाजीनगर येथे खासगी रुग्णालयात हलवण्यात आले.

दरम्यान याप्रकरणी कंटेनर पोलीस ठाण्यात उभे करण्यात आले असून जखमी प्रदीप यांचा भाऊ प्रशांत बिक्कड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कंटेनर चालक व्यंकटेश ईल्लू म लाई (रा.मेट्टूथेरू मुरुगंथ गलपट्टी गिगी वेल्लुपुरम (तामिळनाडू ) याच्याविरुद्ध वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वैजापूर पोलीस करत आहेत.

## धनादेश अनादरप्रकरणी आरोपीस सहा महिन्यांचा कारावास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** कर्जफेडीसाठी दिलेला धनादेश अनादरित झाल्याप्रकरणी आरोपीस सहा महिन्यांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस. के. खान यांनी हा निकाल देताना आरोपीस फिर्यादी पतसंस्थेस ४० हजार रुपये नुकसानभरपाई एका महिन्यात देण्याचे आदेश दिले. अन्यथा अतिरिक्त तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे. प्रकाश मुक्ताबा बत्तीसे (रा. महालगाव, ता. वैजापूर) यांनी रेणुकामाता महिला नागरी सहकारी पतसंस्था कडून २३ एप्रिल २०१४ रोजी १५ हजार रुपये कर्ज घेतले होते. परतफेड न झाल्याने त्यांनी ४ जानेवारी २०१६ रोजी २१ हजार ५२५ रुपयांचा धनादेश दिला. मात्र खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने धनादेश अनादरित झाला. नोटीस देऊनही रक्कम न भरल्याने पतसंस्थेचे व्यवस्थापक संजय शिंदे यांनी चलनक्षम दस्तऐवज कायद्याच्या कलम १३८ अन्वये न्यायालयात दावा दाखल केला होता. पुरावे व युक्तिवाद विचारात घेऊन न्यायालयाने वरीलप्रमाणे शिक्षा सुनावली.

## पोहेगावात शॉर्टसर्किटमुळे खोडवा व पाचट जळाले



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** तालुक्यातील पोहेगाव येथे विजेच्या तारांच्या घर्षणामुळे लागलेल्या आगीत एक एकर खोडवा व सुमारे तीन ते चार एकरांवरील पाचट कुट्टी जळून खाक झाली. बबीताताई भाऊसाहेब रोहमारे व सुमेधा विशाल रोहमारे यांच्या शेतात ही घटना घडली.

शेतकरी विशाल रोहमारे यांनी सांगितले की, ११ केव्ही मुख्य वीजवाहिनीवरील तारांचा घर्षण होऊन शॉर्टसर्किट झाले आणि त्यातून आग भडकली. वारंवार तक्रारी करूनही वीज वितरण कंपनीने ठोस उपाययोजना न केल्याचा आरोप त्यांनी केला.

विशेष म्हणजे, मागील वर्षी याच सर्व्हे क्रमांक ९२/१/२ मध्ये सहा एकरांवरील गळीतास आलेला उस जळून सुमारे सात लाख रुपयांचे नुकसान झाले होते. कृषी विभागाने पंचनामा करून नुकसानभरपाईचा प्रस्ताव वीज कंपनीकडे सादर केला होता. कंपनीने मान्यताही दिली; मात्र अद्याप भरपाई मिळालेली नाही. दरम्यान, आगीच्या वेळी उसतोड कामगारांची मुले शेजारी खेळत होती.

प्रसंगावधान राखून त्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आल्याने मोठा अनर्थ टळला. मागील व सध्याच्या नुकसानीची तात्काळ पाहणी करून भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## राहात्यातील जैन मंदिरात दानपेटी चोरण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** राहाता येथील सुमतीनाथ जैन मंदिर येथे अज्ञात चोरट्यांनी दानपेटी चोरण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. डॉ. राजेंद्र पिपाडा व त्यांच्या अंगरक्षकाच्या सतर्कतेमुळे हा प्रयत्न अयशस्वी ठरला असून संभाव्य मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास चार अज्ञात इसमांनी मंदिर परिसरात प्रवेश केला. मंदिराचा दरवाजा कटरच्या साहाय्याने उचकटून दानपेटी चोरण्याचा त्यांचा प्रयत्न होता. शेजारील नागरिकांना संशय आल्याने त्यांनी संपर्क साधला. त्यानंतर डॉ. पिपाडा यांनी अंगरक्षक शैलेश म ोहन भोयर यांना मंदिराकडे पाठविले.

भोयर घटनास्थळी पोहोचताच दोन इसम मंदिराच्या ओट्यावर व दोन म ागील बाजूस उभे असल्याचे दिसले. त्यांनी आवाज दिल्यावर एका इसमाने लोखंडी रॉडने हल्ल्याचा प्रयत्न केला. मात्र भोयर यांनी तत्काळ मागे सरकत प्रसंगावधान राखले. त्यानंतर सर्व इसम मंदिराच्या मागील बाजूने पसार झाले.

तपासणीअंती मंदिराची दानपेटी सुरक्षित असल्याचे आढळले असून इतर कोणतीही हानी झाली नसल्याची माहिती पोलिसांनी दिली. राहाता पोलीस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## कट्ट्याच्या धाकावर व्यावसायिकाला लुटले; चौकशीत उघड झाला 'गेम'चा कट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** आ. मोनिका राजळे यांच्या वाढदिवसानिमित्त लावण्यात आलेले बॅनर उतरवण्याचे काम सुरू असताना फ्लेक्स व्यावसायिकाला गावठी कट्टा दाखवून लुटल्याची धक्कादायक घटना रविवारी मध्यरात्री पाथर्डी शहरात घडली. या प्रकारामुळे शहरासह व्यापारी वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून आरोपीने पोलिस चौकशीत दिलेल्या कबुलीमुळे प्रकरण अधिकच गंभीर व थरारक बनले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माणिकदौंडी चौक परिसरात फ्लेक्स व्यावसायिक अमीर हबीब शेख हे आ. राजळे यांच्या वाढदिवसाचे फ्लेक्स उतरवण्याचे काम करत होते. रात्री उशिरा दोन दुचाकींवरून पाच जण तेथे आले. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने शेख यांनी त्यांना हटकले असता तीन आरोपी एका दुचाकीची वायर तोडण्याचा प्रयत्न करत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. याबाबत त्यांनी विरोध दर्शवताच आरोपी संतापले. दोघांनी शेख यांना पकडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तर एका आरोपीने गावठी कट्टा काढून त्यांच्या डोक्याला लावत जीवे मारण्याची धमकी दिली.आरोपींनी शेख यांच्या खिशातील रोख रक्कम हिसकावून घेतली आणि घटनास्थळावरून फरार झाले. मध्यरात्री घडलेल्या या घटनेमुळे




संपूर्ण शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. व्यापाऱ्यांमध्ये विशेषतः अस्वस्थता पसरली असून शहरातील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. घटनेनंतर पाथर्डी पोलिसांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेत आरोपींपैकी एकास अटक केली. न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. कोठडीत कसून चौकशी सुरू असताना आरोपीने दिलेल्या कबुलीमुळे पोलिसही चक्रावून गेले आहेत. चौकशीदरम्यान आरोपीने धक्कादायक माहिती देताना, एका स्थानिक व्यक्तीचा गेम करण्याच्या उद्देशाने आपण पाथर्डीत आलो असल्याचे सांगितले. त्याचबरोबर अहिल्यानगर येथील व्यापारी पाथर्डीत माल विक्री करून मोठी रोख रक्कम घेऊन परत जातात आणि त्या व्यापाऱ्याला लुटण्याचाही कट असल्याची कबुली त्याने दिली. त्यामुळे हा केवळ लुटमारीचा गुन्हा नसून नियोजित गुन्हेगारी कारवाईचा भाग असल्याचा संशय अधिक बळावला आहे.

सध्या पाथर्डी शहरात अवैध सावकारी तसेच शेअर मार्केटच्या नावाखाली झालेल्या गुंतवणूक फसवणुकीच्या घटनांमुळे अनेकजण आर्थिक अडचणीत सापडल्याच्या चर्चा सुरू आहेत. आरोपीने संतापातून किंवा सूडभावनेतून हा कट रचला का, याचाही तपास पोलीस करत आहेत. ज्याला ठार मारण्याचा कट होता ती व्यक्ती शहरातील की तालुक्यातील, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही.

दरम्यान, बाहेरील व्यापारी गॅरेजमार्फत किंवा स्वतः वाहनातून माल आणून विक्री करून जाताना रोख रक्कम सोबत नेत असल्याची अचूक माहिती आरोपीपर्यंत कशी पोहोचली, तसेच त्यामागे स्थानिक माहिती देणारा कोणी आहे का, याचाही तपास सुरू आहे. आरोपी सराईत गुन्हेगार असल्याने चौकशीत सहजपणे माहिती देत नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे.